| | |
|---|---|
| **पुणे महानगरपालिका** | नगरसचिव |
| **स्थायी समिती सभा** | विषय क्र. १४४१ ते १४७० |
| **कार्यपत्रिका क्र.३३, दि.३/११/२०१५** | दा. वि.क्र. १४७१ ते १४९४ |
| **सभा क्र.४६,दि.३/११/२०१५ चा वृत्तांत** | ठराव क्र. १४४१ ते १४९४ |

स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ३/११/२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. सौ.कदम अश्विनी नितिन – अध्यक्षा
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत | १०. | मा. सौ.टिळक मुक्ता शैलेश |
| ४. | मा.सौ.ओरसे शारदा शंकर | ११. | मा.तुपेरे राहूल बापू |
| ५. | मा.कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम | १२. | मा.बागवे अविनाश रमेश |
| ६. | मा.ॲड.कदम रामचंद्र उर्फ चंदुशेठ आत्माराम | १३. | मा.सौ.बाबर आरती साईनाथ |
| ७. | मा.केमसे शंकर दत्तात्रय, सभागृहनेते | १४. | मा. राणे अनिल बाबूराव |
| ८. | मा.सौ.ओसवाल दिपाली प्रमोद | १५. | मा.सौ.लोणकर नंदा नारायण |
| ९. | मा.जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत | १६. | मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत |

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. सतिश म्हस्के | मा. | मा. | मा. |
| मा. | मा. | मा. | मा. |

लघुलेखक :–

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त | २६. | मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२) |
| २. | मा. ,अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.) | २७. | मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी |
| ३. | मा. ओमप्रकाश बकोरिया,अति. महा. आयुक्त (वि.) | २८. | मा.शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी |
| ४. | मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ) | २९. | मा.सुनिल केसरी, उपायुक्त (वि.का.१) |
| ५. | मा.अभिषेक कृष्णा, अध्यक्ष व व्यव. संचालक,पीएमपीएमएल | ३०. | मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२) |
| ६. | मा.सुनिल पारखी, नगरसचिव | ३१. | मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.३) |
| ७. | मा.हनुमंत नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.) | ३२. | मा.सुरेश जगताप, उपायुक्त (वि.का.४) |
| ८. | मा.अंबरिष गालिंदे,सह आयुक्त (लेखापरिक्षक) | ३३. | मा.किशोरी गद्रे, उपायुक्त (वि.का. घनकचरा व्यवस्थापन) |
| ९. | मा. सुहास मापारी,(कआ. व क.सं. प्रमुख) | ३४. | मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.) |
| १०. | मा.अनिल पवार, उपायुक्त (विशेष) | ३५. | मा.राजेंद्र राऊत अधी.अभियंता (पथ) |
| ११. | मा.मोरे दगा पितांबर, उपायुक्त (ग.व.नि.) | ३६. | मा.श्रीनिवास कंदूल, अधीक्षक अभियंता (विद्युत) |
| १२. | मा.प्रकाश बोरसे, उपायुक्त (जिं.घ.) | ३७. | मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत) |
| १३. | मा.मंगेश जोशी, उपायुक्त (जनरल)(सेवकवर्ग) | ३८. | मा.ना.न.बारापात्रे, विकास अभियंता, (पथ) |
| १४. | मा.विजय दहीभाते, उपायुक्त (तांत्रिक) | ३९. | मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता(व्हे.डेपो.) |
| १५. | मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख | ४०. | मा.विजय कुलकर्णी,अधी.अभि.(ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प) |
| १६. | मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी | ४१. | मा.संतोष पवार, सुरक्षा अधिकारी |
| १७. | मा. विलास कानडे, उपायुक्त स्थानिक संस्था कर | ४२. | मा.शाम ढवळे, अधीक्षक अभियंता (हरिटेज) |
| १८. | मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता | ४३. | मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी |
| १९. | मा.विवेक खरवडकर, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ ) | ४४. | मा.डॉ.उदय टेकाळे, वि. कार्या.(दक्षता) (सांख्यिकी व संगणक) |
| २०. | मा. सौ. मिनाक्षी राऊत,शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि. | ४५. | मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो) |
| २१. | मा. दहीफळे बबन, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ | ४६. | मा.नितिन उदास, क्षे.अधिकारी |
| २२. | मा.थोरात, प्र.मुख्य विधी अधिकारी | ४७. | मा. राहूल जगताप, सांख्यिकी व संगणकप्रमुख |
| २३. | मा.माधव जगताप, प्र.उपायुक्त अतिक्रमण | ४८. | मा.मंगेश दिघे, पर्यावरण अधीक्षक |
| २४. | मा.घोरपडे, सहा.उद्यान अधिक्षक | ४९. | मा.भोसेकर, प्र.उपायुक्त, सुरक्षा रक्षकप्रमुख |
| २५. | मा. , उपायुक्त (समाजकल्याण) | ५०. | मा.धारूरकर, (पी.एम.पी.एम.एल.) |

# पुणे महानगरपालिका

**स्थायी समिती सभा**

**कार्यपत्रिका क्र.३३, दि.३/११/२०१५**

**सभा क्र.४६,दि.३/११/२०१५ चा वृत्तांत**

मा.अध्यक्षा–प्रथम श्रध्दाजंली वाहू या.

**लेखिका, अनुवादक मीना वांगीकर व जेष्ठ बाल साहित्यकार, सुरेखा पाणंदीकर यांचे निधन झाले यांना श्रध्दाजंली वाहण्यासाठी आपण सर्वांनी उभे रहावे, ही विनंती.**

मा.अध्यक्षा–सभा सुरू करावी.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–मा.चेअरमन साहेब, आम्ही दि.३१ ऑगस्ट रोजी वर्गीकरण मान्य करून घेतले आणि त्याची अंमलबजावणी करून ते वॉर्ड ऑफिसकडे पाठविले आहे. परंतु क्षेत्रिय कार्यालयाने अद्याप कामाची सुरवात केलेली नाही. आमची कामे क्षेत्रिय कार्यालयाकडून मार्गी लावली जात नाहीत. आम्ही असे किती दिवस गप्प बसायचे?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–मा.अध्यक्षा, आम्ही दोन दिवसांमध्ये सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित करणार आहोत आणि त्यांच्याकडील करंट स्टेटस काय आहे? त्यांच्याकडून किती टेंडर्स लावली गेली आहेत? याबाबतची सर्व माहिती घेऊन पुढील सभेमध्ये सादर करू.

मा.अध्यक्षा–दाखलचे विषय सुरू करावेत.

मा.नगरसचिव–दाखल विषय सुरू करीत आहोत.

## दाखल विषय

**दाखल विषय क्र–१४७१**

प्रभाग क्र. ६७ ब तावरे कॉलनी रस्ते यु.टी.डब्ल्यू.टी. पध्दतीने काँक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अे.आर.कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,९४६/– पेक्षा २२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८,९९,९५७=८८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५२५ दि.२९/१०/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४७२**

प्रभाग क्र. ३८ ब विविध ठिकाणी डेकोरेटीव्ह पोल उभे करणे, इंडक्शन फिटींग्ज बसविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सार्थक इलेक्ट्रोमेक प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८३,८१,४३५/– पेक्षा ३१.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५७,८२,३५२=०१ पर्यंत काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/तांत्रिक/५२६ दि.२९/१०/२०१५ चे पत्र.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४७३**

पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलासाठी मनपा चासीजवर टेंडर स्पेसिफिकेशननुसार अत्याधुनिक फायर टेंडर बांधणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून १ नग अत्याधुनिक फायर टेंडर बांधणीकरीता र.रु.५८,६०,१००/– याप्रमाणे ३ नग अत्याधुनिक फायर टेंडर बांधणीकरीता एकूण र.रुपये १,७५,८०,३००/– (अक्षरी र.रुपये एक कोटी पंच्याहत्तर लाख ऐंशी हजार तीनशे फक्त) पर्यंत सर्व करांसह बांधणी करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/५२७ दि.२९/१०/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–अग्निशामक दलाच्या बाबतीत वर्तमानपत्रात बातमी आली आहे की, कर्मचाऱ्यांना दोन ते तीन वर्षानंतर युनिफॉर्म्स दिले आहेत आणि ते सुध्दा चांगले नसल्याचे वृत्त आले आहे. या गणवेशाच्या दर्जाबाबतची माहिती द्यावी.

मा.अध्यक्षा–मा.स्थायी समितीने त्यावेळी माहे जुलै मध्येच हा विषय सादर झाल्याबरोबर लगेचच मान्य करून दिला होता. याबाबत माहिती द्यावी.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आता मा.सभासद, अविनाशजी बागवे यांनी फायमनच्या युनिफॉर्म्स वाटपाबद्दल विचारणा केली आहे.

मा.अविनाश बागवे–हे युनिफॉर्म्स निम्म्या कर्मचाऱ्यांना दिले आहेत आणि ते सुध्दा निकृष्ट दर्जाचे होते. याबाबत वर्तमानपत्रामध्ये फोटो सुध्दा आले होते.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(वि)–मा.अध्यक्षा, यामध्ये ३ ते ४ लोकांची अशी तक्रार आली होती की, या युनिफॉर्म्सची शिलाई आणि मापे व्यवस्थित नाही आणि निळया रंगाच्या शेडमध्ये सुध्दा फरक होता. आमच्या युनियनसोबतच्या बैठकीमध्ये आम्ही रेमंण्ड कंपनीचे कापड फायनल केले होते आणि पुरवठ्यामध्ये मात्र वेगळया कापडाचा पुरवठा झाला आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–नंतर वेगळया दर्जाचे कापड पुरविले गेले का?
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(वि)–नाही, फक्त रंगामध्ये फरक आला होता.
मा.अविनाश बागवे–वूलच्या रंगामध्ये फरक आला होता.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(वि)–त्यानंतर आम्ही संबंधीत पूनम ड्रेसेस, चीफ फायर ऑफिसर्स व तक्रारदार कर्मचारी यांना बोलावून एकत्रित बैठक आयोजित केली. त्यावेळी पूनम ड्रेसेस,कॉन्ट्रक्टर यांना असे सांगण्यात आले आहे की, सुरूवातीला युनियनसोबतच्या बैठकीमध्ये जे कापड निश्चित करण्यात आले होते त्याच कापडाचा पुरवठा करावा. तसेच ज्या गणवेशाची मोजमापे चुकली आहेत त्याबाबत त्याचे असे म्हणणे आहे की, कर्मचाऱ्यांच्या नावांमध्ये बदल झाल्यामुळे असे झाले होते. परंतु यामध्ये कापडाचा दर्जा,रंग आणि मोपमापे याबाबत जे काही झाले आहे ते त्यांच्याकडून दुरूस्त करून घेणार आहोत आणि ते तसे झाले नाही तर आम्ही त्यांच्यावर कारवाई करणार आहोत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपल्याकडे उपलब्ध असलेले फायर सूट परफेक्ट आहे का? यामध्ये कर्मचाऱ्यांची सुरक्षितता पाहिली आहे का? याबाबतची माहिती द्यावी.
मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्निशमन अधिकारी)– मा.अध्यक्षा, आता अग्निशामक दलाकडे जे वूलनचे गणवेश आहेत त्यामुळे आपण आगीच्या जवळ जाऊन काम करू शकतो. दुसरे फायर प्रॉक्सीमेंट सूट, हे प्रत्येक फायर स्टेशनला ३,३, दिलेले आहेत. यामुळे आपल्याला आगीच्या जास्तीत जास्त जवळ जाऊन काम करता येईल परंतु आपल्याकडे आगीच्या आतमध्ये जाऊन काम करण्यासाठीचे गणवेश आपल्याकडे नाहीत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–तसे गणवेश उपलब्ध आहेत का?
मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्निशमन अधिकारी)– ते उपलब्ध आहेत परंतु त्याचा ड्युरेशन फार कमी आहे. यामध्ये आपण फक्त ३० सेकंद ते १ मिनिटांपर्यंत, ज्या कारणांमुळे ती आग लागली आहे उदा. गॅसमुळे आग लागली असेल तर तो बंद करणे किंवा आगीमधून एखाद्या व्यक्तीला बाहेर घेऊन येणे. आपण या सूटमुळे, एवढेच करू शकतो. या सूटचा ड्युरेशन फार कमी आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आता आपण असे सांगितले की, आगीचे कारण बंद करायचे असेल तर, आगीच्या मूळ ठिकाणी जाऊन परत यायचे असेल तर. ही गरज आहे. मग आपण हे युनिफॉर्म विकत का घेतले नाहीत? एखाद्या प्रसंगामध्ये लहान मूल अडकले असेल आणि त्या मुलाला पळत जाऊन उचलून आणायचे आहे आणि ते आपण आणू शकणार नाही.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(वि)–आम्ही सिलेक्टेड खरेदी करू.
मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्निशमन अधिकारी)– आपल्याला अशी खरेदी करता येईल, याबाबत आपण मागे प्रस्ताव सादर केला होता परंतु त्याच्या किंमती जास्त असल्यामुळे त्यावेळी ते होऊ शकले नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्यांची किंमत ५० कोटी रू.आहे का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा युनिफॉर्म प्रत्येक फायर सेंटरला एकतरी उपलब्ध करून द्यावा.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–फायरमनचे शूज चांगल्या दर्जाचे आहेत का? याबाबत माहिती द्यावी.
मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्निशमन अधिकारी)– आता गणवेशाबरोबरच गमबूट सुध्दा आलेले आहेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मध्यतंरी असे शूज होते की, त्यातून पायाची बोटे बाहेर येत होती आणि मग आग लागल्यावर फायरमन काय करणार?
मा.प्रशांत रणपिसे,(मुख्य अग्निशमन अधिकारी)–मा.अध्यक्षा, आता गणवेशाबरोबर डकबॅकचे गमबूट आलेले आहेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण कोणत्या कंपनीचे शूज विकत घेतो?
मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्निशमन अधिकारी)– आपण डकबॅक कंपनीचे शूज विकत घेतो.
मा.अध्यक्षा–ही कंपनी जुनी आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–नाही, आगीच्या वेळी दुसरे शूज असतात. ते कोणत्या कंपनीचे आहेत?
मा.प्रशांत रणपिसे(मुख्य अग्निशमन अधिकारी)– आता ते सांगता येणार नाही. ते कोठी कार्यालयाकडून पाठविले जातात.
मा.अध्यक्षा–ही बाब आपणास माहिती असली पाहिजे आणि यालाच असे म्हणतात की, एकमेकांकडे विषय ढकलणे. तुम्ही साहित्य वापरता आणि मग याबाबत तुम्हाला माहिती असायला नको का?
मा.प्रशांत रणपिसे,(मुख्य अग्निशमन अधिकारी)– मा.अध्यक्षा, अजून वाटपाला सुरूवात केलेली नाही.
मा.अध्यक्षा–तुम्ही कंपनीच्या नावाबाबत आता कोठी कार्यालयाकडे बोट दाखवित आहात. परंतु आपणास कंपनीचे नाव माहिती असले पाहिजे. तुम्ही आता वर्षानुवर्षे त्या डिपार्टमेंटचे हेड झाला आहात आणि कंपनीचे नाव सांगू शकत नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आता आपण या सगळया बाबींमध्ये दखल घेतली पाहिजे तरच आपण स्मार्टसिटी होऊ शकतो.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४७४**

प्रभाग क्र. ६ मध्ये खडकी रेल्वे स्टेशन मागील मॉन्टवर्ट सोसायटी समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व इतर कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोतीलाल धूत सॅन्ड ॲण्ड स्टोन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,७८९/– पेक्षा २३.०३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७६,९६,८३७=५९ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५२९ दि.२९/१०/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४७५**

मिळकतकर 'ना देय दाखला' ऑनलाइन देणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/५३१ दि.३०/१०/२०१५ चे पत्र.

१) मिळकतीचे ना देय प्रमाणपत्र मिळणेसाठी पुणे महानगरपालिकेकडे सद्या असलेले PT-2 या फॉर्मनुसार होत असलेली प्रक्रियेस मिळकतदार Online No Dues Certificate घेवू इच्छीतील ज्यांना तो Digitally Signed No Dues Certificate विनामुल्य देणेस व जे मिळकतदार ऑनलाइन ना देय प्रमाणपत्र घेवू शकणार नाही त्यांना पुणे मनपाच्या सर्व कार्यालयामध्ये संगणकीय प्रणालीव्दारे ना देय प्रमाणपत्र सदयस्थितीत अस्तित्वात असलेल्या पध्दतीनेच उपलब्ध करुन देणेस.

२) ज्या मिळकतीचा 'ना देय दाखला' आवश्यक आहे त्यांनी त्या मिळकतीवरील मिळकतकराची संपूर्ण रक्कम (मागील थकबाकी व शास्तीसह) पुणे महानगरपालिकेकडे जमा केलेली असल्यास/धनादेश व डीडीव्दारे जमा केलेली रक्कम सदरचे धनादेश / डीडी क्लीअरन्स होवून पुणे मनपाच्या खात्यात रक्कम जमा झाल्यानंतर सदर मिळकतीचा संगणक कोड टाकून ऑनलाइन ना देय दाखला (Online No Dues Certificate) propertytax.punecorporation.org या संकेत स्थळावर क्लीक केल्यानंतर मिळकतीचे त्या आर्थिक वर्षाअखेर पर्यंत मिळकतकर थकबाकी नसल्याचे 'ना देय दाखला' ऑनलाइन प्रिंट (Digitally Signed ) करणेबाबत संगणकीय प्रोग्राममध्ये योग्य ती दुरुस्ती करणेस.

३) प्रस्तुतचे ना हरकत प्रमाणपत्रावर मनपाचे बोधचिन्ह व तदनुषंगिक तांत्रिक बाबी ऑनलाइन उपलब्ध करुन देणेस.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४७६**

वैकुंठ मेहता पुणे विद्यापीठ ते भाऊ पाटील रस्ता जोडणारा ३० मी.डी.पी.रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ॲ.आर.कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४,६२,३०,४३८/– पेक्षा २०.९२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,६५,५९,०३०=३७ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५३३ दि.३१/१०/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४७७**

औंध क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. ८ मध्ये येथील पडिक हद्दीकरीता आऊटसोर्सिंग संदर्भात झाडणकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार Shree Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२८,७९,३७९=३६ पेक्षा ७.२% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०,८६,६९४=६७ पर्यंतचे काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/औंक्षेका/५३६ दि.३१/१०/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४७८**

प्रभाग क्र. ७ गणेशखिंड रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६८,३९,७३६/– पेक्षा १९.११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५५,३२,६६२=४५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५३७ दि.३१/१०/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४७९**

प्रभाग क्र. ७ अ मध्ये पुणे विद्यापीठ येथे राजभवन रस्ते डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६४,९९,६९०/– पेक्षा १९.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५२,५०,४४९=५८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५३८ दि.३१/१०/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४८०**

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागासाठी मनपा चासीजवर टेंडर स्पेसिफिकेशननुसार आर्टीक्युलेटेड क्रेन बांधणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हायवा इंडिया प्रा.लि., नवी मुंबई यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून १ नग आर्टीक्युलेटेड क्रेन एकूण र.रुपये ४८,५३,१६०/– (अक्षरी र.रुपये अठ्ठेचाळीस लाख त्रेपन्न हजार एकशे साठ फक्त) पर्यंत सर्व करांसह बांधणी करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/५४३ दि.३१/१०/२०१५ चे पत्र.

मा.सौ.मुक्ता टिळक–या विषयाबाबत माहिती द्यावी.

श्री.किशोर पोळ,कार्य.अभि.(व्हे.डे.)–मा.अध्यक्षा, आर्टीक्युटेड क्रेन, यास आपण स्पायडर मॅन म्हणतो. हे जलपर्णी काढणेसाठी, पाईप लाईन लेन करणे, अतिक्रमणच्या गाडया उचलणे इ.कामासाठी सन २००३ मध्ये अशा गाड्या विकत घेतल्या होत्या आणि त्याचे लाईफ आता संपलेले आहे. त्या गाड्यांचा आता वारंवार मेटेनेंन्स येत आहे.

मा.अविनाश बागवे–अतिक्रमणच्या गाड्या उचलणे.

श्री.किशोर पोळ,कार्य.अभि.(व्हे.डे.)–होय, याव्दारे बॉक्स, छोट्या कोठ्या उचलल्या जातात, याव्दारे छोटे स्टॉल्स उचलले जातात. यामध्ये स्पॉयडर, ग्रॅप बकेटस आहेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४८१**

श्री. कुणाल कुमार, भा.प्र.से. महापालिका आयुक्त यांना दिनांक १५ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत Smart City Expo & World Congress 2015, Barcelona, Spain येथील कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबतची बाब निदर्शनास आणल्याची नोंद घेण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उआ(साप्र)/५४७ दि. २/११/२०१५

मा.अविनाश बागवे–यामध्ये कोणकोण आहेत? मा.आयुक्त साहेबांच्या बरोबर मा.महापौर साहेब, नाहीत का?

मा.नगरसचिव–यामध्ये फक्त, मा.आयुक्त साहेब आहेत.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून नोंद घेण्यात आली.

**दाखल विषय क्र–१४८२**

बोपोडी एलफिस्टन रोड येथील किर्लोस्कर ऑईल इंजिनच्या मागील बाजूस असणाऱ्या कुंदन कुशनगर ते हॅरिस ब्रिजपर्यंत नदीच्या कडेने डबरवाळ नाला ते रेल्वे क्रॉसिंग मनपा हद्दीपर्यंत भोईटे वस्तीपर्यंत तसेच औंध बोटॅनिकल मुळा नदीच्या कडेने मुख्य ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७०,२२,९७५/– पेक्षा २८.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४९,८७,०१४=५५ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/५५४ दि.३/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र – १४८३**

पुणे महानगरपालिकेच्या विधी विभागाकडील दावे, खटले व न्यायालयीन खर्चाची तरतूद संपुष्टात आल्याने वर्गीकरणाने र.रुपये २७ लाख उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/विधी विभाग/५५५ दि.३/११/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र – १४८४**

पं.नेहरु स्टेडीयम पॅव्हेलियन सुधारणा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार सुराणा नरेंद्र फुलचंद यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५३,६०,५१७/– पेक्षा २४.८०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४०,३१,१०८=७८ पर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे क्र. मआ/भवन /५५६ दि. ३/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४८५**

वडगाव बु. येथील सिंहगड रोड बी.एस.एन.एल. कार्यालयापासून ते वडगांव बु. येथे १८ मी. डी.पी. रस्ता कॅनॉलवर पुलासह विकसित करणे (उर्वरित कामे) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अे.आर.कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,४३,६६,१२३/– पेक्षा २०.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,९४,३१,९८३=०९ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५५७ दि.३/११/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**विषय–**

पुणे महापालिका परिवहन मंडळाकडून जा.क्र. पी.एम.पी.एम.एल./मुलेविअ/३९४४ दि.०७/१०/२०१५ अन्वये पुणे महानगर परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांना (पुणे महानगरपालिकेच्या भाग हिश्यानुसार ६०% ) सन २०१४–१५ या आर्थिक वर्षातील सानुग्रह अनुदानासाठी रक्कम रू.१८,५५,६५,२९५/–(अक्षरी रक्कम अठरा कोटी पंचावन्न लाख पासष्ठ हजार दोनशे पंच्चावन्न रूपये फक्त ) दिवाळी पूर्वी मिळणेबाबत मागणी करण्यात आली आहे.

या अनुषंगाने पुणे महानगर परिवहन महामंडळास पुणे महानगरपालिकेकडून सन २०१४–१५ या वर्षात देणे असलेल्या रकमेतून र.रू.१८,५५,६५,२९५/– (अक्षरी रक्कम अठरा कोटी पंचावन्न लाख पासष्ठ हजार दोनशे पंचावन्न रूपये फक्त) उचल स्वरूपात आदा करणेस मान्यता देण्यात यावी, याबाबत मा.शंकर केमसे, सभागृहनेते, मा.कर्णे गुरूजी यांचे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–पुणे मनपाने पी.एम.पी.एम.एल.कंपनीस या आधी जो निधी दिला आहे, त्यामधून कोणकोणता खर्च केला आहे? याबाबतची माहिती द्यावी.

मा.सौ.मुक्ता टिळक–हे पैसे कसले आहेत?

मा.नगरसचिव–उचल स्वरूपात द्यायचे आहेत.

मा.सौ.मुक्ता टिळक–याबाबत पी.एम.पी.एम.एल.च्या संचालक मंडळामध्ये ठराव झाला आहे का?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर(पी.एम.पी.एम.एल.)–मा.अध्यक्षा, मा.संचालक मंडळाने याबाबीस पूर्वीपासून धोरणात्मक मान्यता दिलेली आहे आणि आपण हे वाटप प्रशासकीय पध्दतीने करीत असतो.

मा.सौ.मुक्ता टिळक–ठीक आहे.

मा.अविनाश बागवे–मा.सभागृहनेते, आपल्या सभेत, सी.एम.डी. साहेब (पी.एम.पी.एम.एल.) यांना बोलवावे याबाबत आम्ही दोनवेळा सांगितले होते. त्यांच्याकडून आलेल्या अहवालावर आपली चर्चा होत नाही आणि तो अहवाल देखील इ.१० वी.च्या मुलाने निबंध लिहल्यासारखा दिला आहे. आम्ही मा.कृष्णा साहेबांना सुध्दा सांगितले होते की, आपण या मिटींगला यावे. परंतु ते का येत नाहीत?

मा.मुकारी आण्णा आलगुडे–आपण त्यांना बोलाविले होते.

मा.अविनाश बागवे–मा.डॉ.श्रीकर परदेशी साहेब, सी.एम.डी.असताना ते प्रत्येक सभेस येत होते. हे का येत नाहीत?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.अति.आयुक्त, बकोरिया साहेब आपण त्यांच्याशी बोलून त्यांना पुढील सभेमध्ये उपस्थित राहण्याबाबत सांगावे.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–ते आमच्याकडे दरवेळेला बोनससाठी प्रस्ताव पाठवितात. परंतु त्यांना यायला नको का? त्यांनी हवेमध्ये दिल्यासारखे करायचे आणि आम्ही ते मान्य करायचे का? हे मान्य करू नका, हे बाजूला ठेवावे. त्यांना हे कळत नाही का? त्यांनी यायला नको का?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–प्रशासनाचा राग कामगारांवर काढू नये.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–आम्ही कामगारांवर राग काढत नाही परंतु संबंधीत अधिकारी इथे उपस्थित राहिले पाहिजेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्यांना पुढील सभेमध्ये उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे.

मा.अविनाश बागवे–त्यांनी आम्हाला असे पत्र पाठविले की, मा.स्थायी समितीने जो अहवाल मागितला होता त्याबाबत आणखी दोन ते तीन महिन्याचा कालावधी आवश्यक आहे. याचे कारण काय आहे? यासाठी ऑलरेडी (तत्कालीन सी.एम.डी.) मा.डॉ.श्रीकर परदेशीसाहेब, यांनी देखील खूप वेळ घेतला होता. त्यावेळी आपल्याकडे सुध्दा १५ ते २० दिवसांपुरता तो पदभार

देण्यात आला होता. त्यावेळी आपल्याला सुध्दा पत्र दिले होते आणि त्यांना देखील पत्रे दिली आहेत. त्यांनी जर याबाबतचा सगळा डाटा गोळा केला असेल तर, त्यांना आणखी दोन महिने कशासाठी हवेत? हे स्पष्टीकरण घेण्यासाठी आम्ही त्यांना मिटींगमध्ये बोलवित आहोत. मा.अति.आयुक्त साहेब, आपण त्यांना विनंती करून सभेला बोलवावे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मागील वेळेस पी.एम.पी.एम.एल.कंपनीस २७ कोटी रू.उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यामधून कोणकोणता खर्च करण्यात आला? याबाबतची माहिती द्यावी.
श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर(पी.एम.पी.एम.एल.)–मा.अध्यक्षा,त्यातील १७ कोटी रू.एसस्क्रो अकौंटमध्ये ठेकेदारांची बिले होती त्यासाठी दिले आहेत. पूर्वी ७.५० कोटी रू.चा ओ.डी.होता तो त्यामध्ये अॅडजस्ट झाला आणि आता आम्हाला चालू महिन्याच्या पगारासाठी ४.५० कोटी रू.कमी पडत आहेत.
मा.अविनाश बागवे–मा.धारूरकर साहेब, तुमचा ओ.डी.करण्यासाठी ते पैसे दिलेले नाहीत.
मा.सौ.मुक्ता टिळक–पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने किती पैसे दिले आहेत? याबाबतची माहिती द्यावी.
श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर(पी.एम.पी.एम.एल.)–आज दुपारी १३ कोटी रू.चा चेक देतो असे सांगितले आहे.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–ते यांच्या अगेन्स्ट देणार आहेत का?
श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर(पी.एम.पी.एम.एल.)–नाही, त्यांच्याकडे जे ६५ कोटीचे येणे होते त्या रक्कमेपोटी ते आपल्याला १३ कोटी रू.देणार आहेत.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–६५ कोटी रू.पैकी फक्त १३ कोटी रू.!
श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर,(पी.एम.पी.एम.एल.)–त्यांनी आतापर्यंत आम्हाला ६५ कोटी रू.पैकी ४५ कोटी ५० लाख रू.दिले आहेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण जेवढा निधी देतो तेवढा निधी ते सुध्दा देतात.
मा.अविनाश बागवे–पुणे महापालिकेने किती कोटी रू.दिले आहेत?
श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर,(पी.एम.पी.एम.एल.)–पुणे महापालिकेने ७८ कोटी ६६ लाख रू.दिले आहेत.
मा.अविनाश बागवे–पुढील सभेत, ज्यावेळी मा.कृष्णा साहेब ज्यावेळी येतील. त्यावेळी या ७८ कोटी रू.खर्चाचा तपशील, यातील रक्कमा कधी अदा करण्यात आल्या? कोणत्या कारणासाठी निधी वापरण्यात आला? याबाबतची सविस्तर माहिती द्यावी.
मा.सौ.मुक्ता टिळक– यामध्ये मला असा प्रॉब्लेम वाटतो की, पुणे महानगरपालिकेने प्रत्येकवेळेला पैसे खर्च करायचे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मात्र ६५ कोटी रू.पैकी वन सिक्स्थ.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–नाही,आपला गैरसमज होत आहे.
श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर,(पी.एम.पी.एम.एल.)–पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आजपर्यंत, ४५ कोटी ५० लाख रू दिले आहेत आणि आज पुन्हा १३ कोटी रू.चा धनादेश देणार आहेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–पुढील सभेमध्ये, पी.एम.पी.एम.एल.च्या अधिकाऱ्यांना बोलावून घ्यावे आणि पी.एम.पी.एम.एल.कंपनी कडील ७८ कोटी रू.च्या खर्चाच्या ब्रेकअपची माहिती द्यावी.
मा.नगरसचिव–आता आपण जो, मा.सदस्यांचा प्रस्ताव ठेवला होता. तो मागे घेऊन, प्रशासनाचे त्याच संदर्भात डॉकेट आलेले आहे. ते डॉकेट मान्य करावयाचे आहे.
मा.अध्यक्षा–मा.सभासदाचा प्रस्ताव मागे घेण्यात येत आहे.
**मा.नगरसचिव–**मा.सभासद यांचे पत्र मागे घेण्यात आले.

**दाखल विषय क्र – १४८६**

पुणे महानगर परिवहन महामंडळास अग्रिम स्वरुपात रक्कम अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/५५९ दि. ३/११/२०१५ चे पत्र.
१. मोफत/सवलतीचे बसपास पोटी पीएमपीएमएलकडून जा.क्र.पी.एम.पी.एम.एल./ मुलेविअ/१८९८ दि.३०/०७/२०१५ अन्वये र.रू.३१,९२,९९,९२२/– येवढया रक्कमेची मागणी करण्यात आली होती. सदर मागणीपोटी मा.स्थायी समिती ठराव क्र.७४३ दि.११/०८/२०१५ चे मान्यतेनुसार पी.एम.पी.एम.एल. संस्थेस र.रू.२० कोटी अग्रिम स्वरूपात आदा करणेत आले आहेत. उर्वरित र.रू.११,९२,९९,९२२/– पैकी र.रू.१० कोटी पीएमपीएमएलने केलेल्या मागणीनुसार अग्रिम स्वरूपात आदा करता येतील. पुणे महानगरपालिकेकडील संबंधित विभागांकडून पीएमपीएमएलच्या मोफत/सवलतीच्या बसपास योजनांची तपासणी झालेनंतर देय ठरणा–या रक्कमेतून अग्रिम स्वरूपात आदा केलेल्या रकमा समायोजित करून उर्वरित रक्कम पीएमपीएमएल संस्थेस आदा करता येईल. त्याचप्रमाणे देय ठरणारी रक्कम उचल स्वरूपात आदा केलेल्या रकमेपेक्षा कमी असल्यास नजीकच्या काळात पीएमपीएमएल संस्थेस आदा करण्यात येणा–या रकमेतून सदरची रक्कम वसूल करण्यास.
२. पीएमपीएमएल संस्थेस चालू महिन्यात (नोव्हेंबर २०१५) संचलन तुटीपोटी आदा करण्यात येणारी र.रू.८.३८ कोटी अग्रिम स्वरुपात आदा करणेस.
मा.अध्यक्षा–हे प्रशासनाचे डॉकेट मान्य करावे.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४८७**

संचेती हॉस्पीटल जवळील रेल्वे कि.मी. १८९/११-१२ येथील रेल्वे उड्डाणपुल क्र. १८९/३ रुंदीकरण करणे हे काम पुर्ण करणे व त्यानुसार ठेकेदार मे.टी.ॲन्ड टी इन्फ्रा प्रा.लि. (टी ॲन्ड टी ग्रुप) यांना बिले अदा करणेसाठी र.रुपये २ कोटीचे वर्गीकरण करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/५६० दि.३/११/२०१५ चे पत्र.

मा.नगरसचिव-हे वर्गीकरण आहे आणि यामध्ये जुने काम नगररोड येथील आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते-नगर रोड येथील कामाचे पैसे, आपण इथे वर्गीकरण करीत आहोत का?

मा.नगरसचिव-होय.

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाह व प्रकल्प)-मा.अध्यक्षा, मागील वर्षी तरतूद उपलब्ध होती परंतु रेल्वे खात्याने येथील गरडल्स लॉन्चिंग करण्यासाठी मे महिन्यामध्ये परवानगी दिली. त्यामुळे हे काम या आर्थिक वर्षात पूर्ण झाले. या कामासाठी ३.५० कोटी रू.आवश्यक आहेत. या प्रस्तावामध्ये आपण २ कोटी रूपयांची मागणी करीत आहोत आणि नंतर १.५० कोटी रू.प्रस्ताव आपल्यासमोर येणार आहे.

मा.अविनाश बागवे-या कामासाठी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात कोणतीच तरतूद नाही का?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाह व प्रकल्प)-सन २०१५-१६ मध्ये जी तरतूद आहे त्या व्यतिरिक्त हे ३.५० कोटी रू.आवश्यक आहेत.

मा.अविनाश बागवे-या कामासाठी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात किती तरतूद केली आहे?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाह व प्रकल्प)-यावर्षी ६० लाख रू.ची तरतूद आहे आणि त्या व्यतिरिक्त ही रक्कम आवश्यक आहे.

मा.अविनाश बागवे-उड्डाणपूलासाठी ६० लाख रू.तरतूद !

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाह व प्रकल्प)-नाही, संचेती हॉस्पीटल येथील उड्डाणपूल रूंदीकरणाच्या कामासाठी ६० लाख रू.ची तरतूद करण्यात आली होती. ही तरतूद पथ विभागाच्या बजेट हेडवर उपलब्ध होती. मागील वर्षी पूर्ण तरतूद होती परंतु रेल्वेने परवानगी न दिल्याने ते काम झाले नव्हते. त्यामुळे ती रक्कम अदा करू शकलो नाही.

मा.अविनाश बागवे-मा.सभागृहनेते, मा.मुख्यसभेमध्ये उड्डाणपूलांच्या कामांबाबत चर्चा झाली होती. आपण शहरातील उड्डाणपूलांबाबती चर्चा कधी आयोजित करणार आहोत? यामध्ये टी.एन.टी., इन्फ्रा, अशा दोन, तीनच कंपन्या सगळे उड्डाणपूल करीत आहेत. त्याबाबत अनेक प्रश्न निर्माण होत आहेत? आपण त्या विषयावर कधी चर्चा करणार आहोत?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते-शहरातील तीन चार ब्रीजेसचे काम पूर्ण करण्यासाठी पैसे आवश्यक आहेत.

मा.सौ.मुक्ता टिळक- मध्यतंरी आपण टी.एन.टी.कंपनीस काय दिले ?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाह व प्रकल्प)-मा.अध्यक्षा, मागील वेळेस आपण ३ कोटी रू.चे वर्गीकरण मान्य करून, मा.मुख्यसभेकडे मान्यतेसाठी पाठविले होते. परंतु मागील सभेत तो विषय दफ्तरी दाखल झाला आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक-मा.मुख्यसभेने ठराव दफ्तरी दाखल केला म्हणून ही मागणी केली आहे.

मा.अध्यक्षा-हे काम झाले पाहिजे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते-हे काम झाले पाहिजे त्यामुळे हा विषय मान्य करावा.

**निर्णय-**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र-१४८८**

प्रभाग क्र. ३४ अ स.नं. १४३+१४४ कोथरुड येथे यशवंतराव चव्हाण नाटयगृह विस्तारीकरण अंतर्गत बाल नाटयगृह/शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे कलामंदिर उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७,९७,३५,१९०/- पेक्षा १७.७७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६,५५,६६,२४६=७३ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रांनुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे क्र. मआ/भवन /५६१ दि. ३/११/२०१५ चे पत्र.

**निर्णय-**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र - १४८९**

पुणे महानगरपालिका हद्दीत चालू असलेल्या बांधकाम प्रकल्प परवानगी व इतर मान्यता प्रकरणांमध्ये विना भोगवटा जागा वापर, नियमान्वीत होवू शकणारी अनधिकृत बांधकामे व इतर बाबींवर करण्यात येणारी दंड आकारणी प्रकरणे मा. महापालिका आयुक्त यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविताना दंडाच्या रकमेमध्ये अनेकवेळा तफावत होत असल्याचे दिसून येते. पुणे महानगरपालिके कडून होत असलेल्या या दंडात्मक कारवाई विरोधात काही विकसकांनी मे. न्यायालयात दाद मागितली आहे. परंतु या प्रकरणी दंडात्मक कारवाई करणे विरोधात मे. न्यायालयाने कोणताही मनाई हुकूम अद्याप महापालिकेस दिलेला नाही.त्यामुळे काही विकसकांनी न्यायालयीन निर्णयास अधीन राहून हमी पत्र देवून भोगवटापत्र देण्याची मागणी केली आहे.

तरी केवळ हमीपत्राच्या अधारे विकसकास भोगवटापत्र न देता आकारलेल्या दंडात्मक कारवाई एवढी अनामत रक्कम घेवून संबंधित विकसकास भोगवटा पत्र देण्यात यावे. या ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, याबाबत मा.अविनाश बागवे व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. २९/१०/२०१५ चे पत्र.

मा.अविनाश बागवे–मा.अति.महा.आयुक्त, बकोरियासाहेब, महानगरपालिकेचे जे कोट्यावधी रू. बुडतात. बांधकाम व्यावसायिकांच्या फक्त लेटरहेडवर आपण हमी पत्र घेऊन त्यांना भोगवटा पत्र देत आहोत. हे कशाच्या आधारे? वास्तविक पाहता त्यांना जर कोर्टकेसच्या दाव्यांखाली हमीपत्र देत असाल तर त्यांनी कोर्टातर्फे स्टॅम्प ड्युटी भरून, त्याठिकाणी स्टॅम्पपेपर वर लिहून देणे अपेक्षित आहे. आपले अधिकारी, त्यांचे ५ कोटी रू., ६ कोटी रू.चे दंड असेच सोडून देत आहेत. इतर बांधकाम व्यावसायिक बिचारे २ कोटी रू.ते ४ कोटी रू.भरून मनी अगेन्स्ट प्रोटेन्स भरून भोगवटा पत्र घेतात. मग आपण ठराविक लोकांना ही सवलत का देत आहोत? म्हणून आमची विनंती आहे, म्हणून आम्ही तो ठराव दिला आहे की, त्यांच्याकडून पैसे भरून घ्यावेत आणि कोर्टाने कळविल्यानंतर ते पैसे परत द्यावेत. मनी अगेन्स्ट प्रोटेन्स भरून घ्यावेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय अभिप्रायसाठी द्यावा.

मा.अविनाश बागवे–महानगरपालिकेकडे पैसे नाहीत म्हणून एकीकडे ओरडत आहेत. कामे थांबविली जात आहेत, विकासकामे होत नाहीत. त्यामुळे आमचा विरोध आहे. अन्यथा तुम्ही हे मतदानाने फेटाळावे. जनतेला कळू द्यावे की, नक्की कोणासाठी काय चालले आहे? मा.वाघमारे,साहेब आपण हा विषय अभिप्रायसाठी पाठवावा असे सांगत आहात. परंतु आम्ही मागील सभेमध्ये एक ठराव केला की, २५ लाख रू.च्या वरील बांधकाम परवानगीबाबतची माहिती मा.स्थायी समितीला देण्यात यावी आणि आपण एका आठवड्यामध्ये ते मा.स्थायी समितीला दाखवायला नको का? आपण तो विषय अवलोकनासाठी ठेवला आहे का?

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–त्या आठवड्यामध्ये २५ लाख रू.च्या वरील कंपाऊंडींग फी बाबतची प्रकरणे झाली नाहीत. एका महिन्यामध्ये जेवढी होतील ती आम्ही मा.स्थायी समितीकडे माहितीसाठी आणू.

मा.अविनाश बागवे–आपण मंथली माहिती देणार आहात का?

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–मा.अध्यक्षा,आपणास लगेच माहिती हवी असे असेल तर लगेच पाठवू. आम्ही जशी टी.डी.आर.ची माहिती पाठवितो तशीच ही माहिती सुध्दा पाठवू.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ते नोंद घेणार आहेत.

मा.अध्यक्षा–ती माहिती मा.स्थायी समितीकडे पाठवावी.

मा.अविनाश बागवे–ठीक आहे, आपण हा प्रस्ताव अभिप्रायसाठी द्यावा परंतु मा.वाघमारे साहेब आपण हा अभिप्राय ८ दिवसांमध्ये द्यावा. कारण यापुढे तुम्ही नेहमी स्मार्टसिटीसाठी व्यस्त राहणार आहात.

मा.अध्यक्षा–या विषयाबाबत प्रशासनाने अभिप्राय द्यावा.

**निर्णय–**सदर दाखल प्रस्तावावर मा.महा.आयुक्त यांनी ८ दिवसांमध्ये अभिप्राय द्यावा.

**दाखल विषय क्र–१४९०**

मा.उपमहापौर कार्यालय चहापान खर्चासाठी र.रुपये ७५ हजार, मा.सभागृह नेता कार्यालय चहापान खर्चासाठी र.रुपये ७५ हजार, मा.विरोधी पक्षनेता कार्यालय चहापान खर्चासाठी र.रुपये ७५ हजार असे एकूण र.रुपये २.७५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी, याबाबत मा.विनायक हनमघर व मा.सौ.मोहिनी देवकर यांचे दि. २/११/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र–१४९१**

प्रभाग क्र. ६७ ब पुणे सातारा रोडवरील मोरे वस्ती येथे बांधण्यात आलेल्या बहुउद्देशीय केंद्रात महिलांसाठी योगासन वर्ग, महिलांसाठी उद्योजकता शिबीर, विविध प्रकारचे व्यवसायिक प्रशिक्षण वर्ग स्वयंसेवी संस्था व पुणे म.न.पा. यांचे संयुक्त सहकार्याने राबविण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.अश्विनी कदम, अध्यक्ष, स्थायी समिती व मा.शंकर केमसे, सभागृह नेता यांचे दि. ३/११/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र – १४९२**

महात्मा फुले पुण्यतिथी महात्मा फुले वाड्यावर साजरी करणेसाठी र. रू. ५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात द्यावी, (मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.) याबाबत मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी, मा.शंकर केमसे,सभागृह नेता व मा.सौ.अश्विनी कदम, अध्यक्ष, स्थायी समिती यांचे दि. ३/११/२०१५ चे पत्र.

मा.अध्यक्षा–सदरचा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र – १४९३**

महाराष्ट्र राज्यातील नवी मुंबई, ठाणे, सोलापूर, कल्याण– डोंबविली महानगरपालिकेमध्ये राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत एकवट वेतनावर काम करणाऱ्या दरवर्षी सानुग्रह अनुदान व बोनस दिला जातो. पुणे महानगरपालिकेत सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत ४१ कर्मचाऱ्यांची नियुक्ती १ वर्षाच्या करारतत्वावर करण्यात येते. या कर्मचाऱ्यांना इतर

महानगरपालिकेप्रमाणे पुणे महानगरपालिकेत एकवट वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान व ८.३३% बोनस देण्यास मान्यता द्यावी, (मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.) याबाबत मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.शंकर केमसे, सभागृह नेता यांचे दि. ३/११/२०१५ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–याबाबत माहिती द्यावी.
मा.डॉ.परदेशी,आरोग्यप्रमुख–मा.अध्यक्षा,राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत, आपल्याकडे कॉन्ट्रक्ट बेसवर ४१ सेवक आहेत. ते १२ महिन्यांच्या कॉन्ट्रक्टवर असतात आणि त्या कर्मचाऱ्यांनी बोनसची मागणी केली आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ते टी.बी.रोगाच्या संदर्भात काम करतात आणि हे फार अवघड काम आहे. हा विषय मान्य करायला पाहिजे.
मा.डॉ.परदेशी,आरोग्यप्रमुख–इतर महानगरपालिकांनी असे दिलेले आहे आणि त्या बेसीसवर त्यांनी मागणी केली आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– हा विषय मान्य करायला पाहिजे.
मा.नगरसचिव–हा विषय, मा.मुख्यसभा मान्यता देईल या भरवश्यावर आणि हा विषय वन–के खाली मा.मुख्यसभेस दाखल करण्यात येईल.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र –१४९४**

सुरक्षा विभागाकडील नियुक्त खाजगी सुरक्षा मदतनिसांचे पगारपोटी खर्च होणाऱ्या रकमेची बिले अदा करणेस २०१५ अखेरीस बजेट तरतूद उपलब्ध नाही. सदर नियुक्त सर्व खाजगी मदतनिसांचे पगार करणे क्रमप्राप्त असल्याने दि.३१ मार्च २०१६ अखेर सदर बिलापोटी आवश्यक र.रू. १८,६०,००,०००/–( अठरा कोटी साठ लाख फक्त) मुख्य लेखापाल यांनी अखर्चीत रकमेतून उपलब्ध करून देणेस तसेच नजीकचे काळात येणारे सणसुद विचारात घेता मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर खाजगी सुरक्षा रक्षकांचे पगारपोटी खर्च होणाऱ्या रकमेची बिले अदा करणेस मान्यता द्यावी, मा.श्रीकांत जगताप, मा.मुकारी अलगुडे व मा.राहूल तुपेरे यांचे दि. ३/११/२०१५ चे पत्र.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–विषय काय आहे? मा.नगरसचिव, विषय वाचून दाखववा.
मा.नगरसचिव–''सुरक्षा विभागाकडील नियुक्त खाजगी सुरक्षा मदनीसांच्या पगारापोटी खर्च होणाऱ्या रक्कमेची बिले अदा करणेस जून १५ अखेरीस...''
मा.अविनाश बागवे–हा चुकीचा विषय होईल. ही ठेकेदाराची जबाबदारी आहे. आम्ही याबाबत प्रशासनाकडे अहवाल मागितला होता. परंतु तो अद्याप दिलेला नाही. तो अहवाल दिल्यानंतर १८ कोटी रू.नव्हेतर २० कोटी रू.द्यावेत.
मा.अध्यक्षा–प्रशासनाने तो अहवाल का सादर केला नाही? हा विषय किती तारखेला सादर केला होता? याबाबत माहिती द्यावी.
मा.नगरसचिव–या विषयावर, दि.२२/९/२०१५ रोजी, मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा, असा निर्णय झाला आहे.
मा.अध्यक्षा–मग, हा अहवाल का दिला नाही?
मा.श्रीकांत जगताप–यामुळे त्या कामगारांवर गदा का आणीत आहात?
मा.अण्णा आलगुडे–आता दिवाळी तोंडावर आली आहे.
मा.श्रीकांत जगताप–ते कामगार गरीब आहेत.
मा.अविनाश बागवे–चुकीचा विषय मान्य करू नका. आम्हाला ऑन रेकॉर्ड माहिती द्या आम्ही मग न्यायालयात आणि कोर्टात जाणार आहे. आम्हाला त्रास व्हायला नको त्यामुळे आम्ही त्या पापाचे वाटेकरी होणार नाही. तुम्हाला हा विषय मान्य करायचा असेल तर माहिती द्यावी.
मा.श्रीकांत जगताप–हा विषय आता मान्य करा आणि नंतर माहिती घ्या.
मा.अविनाश बागवे–नाही, आता माहिती द्यावी.
मा.श्रीकांत जगताप–हा विषय मान्य करण्यासाठी मतदान घ्यावे.
मा.अविनाश बागवे–हा विषय चुकीचा होईल.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या विषयाबाबत माहिती द्यावी.
मा.अविनाश बागवे–यामध्ये त्या सेवकाला किती पैसे मिळणार आहेत? आणि त्याला जर १२ हजार रूपये मिळणार असतील तर, आपण सगळे स्वखुषीने करू.
मा.श्रीकांत जगताप–महानगरपालिकेमध्ये असे कॉन्ट्रक्टवरील १० हजार कामगार आहेत.
मा.अविनाश बागवे–असे विषय असतील तर आपण आणावेत.
श्री.भोसेकर,प्र.मुख्यसुरक्षा अधिकारी–मागील वर्षी बिले देण्यासाठी ७.६४ तरतूद होती आणि मागील वर्षीचे वर्गीकरण मा.स्थायी समितीमध्ये मंजूर झाले आणि ते मा.मुख्यसभेमध्ये वेळेत मंजूर न झाल्यामुळे मागील वर्षीची बिले या बजेटमध्ये खर्ची पडली.
मा.अविनाश बागवे–मागील वर्षी ७.६४ ची बिले दिली आहेत. ते बजेट कोणते होते?
श्री.भोसेकर,प्र.मुख्यसुरक्षा अधिकारी–सुरक्षाचे बजेट होते.
मा.अविनाश बागवे–ते सन १५–१६ चे बजेट होते का?
श्री.भोसेकर,प्र.मुख्यसुरक्षा अधिकारी–नाही, ते सन १४–१५ चे बजेट होते. आता करंट बजेटचे दिले आणि त्यातून मागील बिले दिली.
मा.अविनाश बागवे–मग त्यासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेतली होती का?

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा,त्यावेळी मा.स्थायी समितीने, वेळोवेळी येणारी बिले खर्ची टाकण्यासाठी ठ.क्र.....

मा.अविनाश बागवे–सुरक्षा विभागाचा प्रत्यक्ष चार्ज कोणाकडे आहे?

मा.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा,आता अधिकारी नव्याने जॉईन झालेले आहेत त्यामुळे मी माहिती देत होतो.

मा.श्रीकांत जगताप–मागील बिले यातून दिल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा,जुन्या बिलांसाठी सध्याच्या तरतुदीमधून ते कसे काय बिल अदा करू शकतात?

मा.राजेंद्र शिळीमकर– मा.अध्यक्षा,आपण गंगाधाम चौकातील रस्त्याचे बिल आता दिले आहे.

मा.अविनाश बागवे–ते आपण मा.स्थायी समिती व मा.मुख्यसभेची मान्यता घेऊन केले आहे. हे विदाऊट मान्यता कसे होते? याबाबत आम्ही विचारत आहोत.

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा,यामध्ये मान्यता न घेता कोणतीही पेमेंटस केलेली नाहीत. आम्ही हे हंड्रेन्ड पर्सेन्ट मान्यता घेऊन केले आहे.

मा.अविनाश बागवे–याबाबत कोणता ठराव झाला होता? याची माहिती द्यावी.

मा.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा, स्थायी समिती ठ.क्र.२१९७ दि.२६/२/२०१५ अन्वये ६.६८ कोटी रू.चे वर्गीकरण करून दिले होते आणि तो प्रस्ताव मा.मुख्यसभेच्या मान्यतेसाठी दिला होता. मा.मुख्यसभेमध्ये तो विषय, विषय क्र.७२५ अन्वये मान्यतेसाठी होता. दि.३१ मार्च २०१५ पर्यंत तो मंजूर होणे गरजेचे होते कारण ते मागील वर्षाचे बजेट होते. त्याला मान्यता न मिळाल्यामुळे, कालापव्य झाल्यामुळे.

मा.अविनाश बागवे–साहेब, एक मिनिट, तो ठराव मा.मुख्यसभेने फेटाळला होता.

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–फेटाळला नाही.

मा.अविनाश बागवे–तो विषय अमान्य केला होता का?

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–ते दि.३१ मार्चच्या पूर्वी मान्य होऊ शकले नाही आणि तो विषय दफ्तरी दाखल झाला.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा,विषय दफ्तरी दाखल झाला म्हणजे असे की, मा.मुख्यसभेने मान्यता दिली नाही.

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मान्यता दिली नाही, मा.स्थायी समितीने वर्गीकरण करून उपलब्ध करून दिलेले ६.६८ कोटी रू.हे मंजूर होऊन सुध्दा आम्हाला मिळाले नाहीत. त्यामुळे आम्हाला ते पैसे या आर्थिक वर्षामधून देणे गरजेचे झाले.

मा.अविनाश बागवे–साहेब, तुम्ही ऑन रेकॉर्ड सांगत आहात की, मान्यता होऊनही पैसे मिळाले नाहीत. जेव्हा वर्गीकरणाची मान्यता होते ती मा.स्थायी समिती आणि मा.मुख्यसभा अशा दोन्हींची मान्यता मिळाल्यानंतर, ती मान्यता होते.

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा,मा.स्थायी समितीची मान्यता मिळाली परंतु मा.मुख्यसभेची मान्यता मिळाली नाही.

मा.अविनाश बागवे–त्यावेळी मा.मुख्यसभेमध्ये मान्यता मिळाली नाही कारण त्याचवेळेस लोकांना कळाले होते की, हा चुकीचा विषय आहे.

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–नाही साहेब, तुम्ही गैरसमज पसरवित आहात. तो चुकीचा विषय नव्हता. तो विषय योग्यच होता.

मा.अविनाश बागवे–पवार साहेब, आपण स्पेसिफिकली बोलत आहोत. आपण खूप वेळ चर्चा करीत आहोत.

मा.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–सर,यामध्ये प्रपोगंडा होत आहे, आरोप केले जातात. मी कुठलेही मान्य करून घेणार नाही. आम्ही प्रत्येक वेळेस प्रत्येक गोष्टीस मान्यता घेतलेली आहे.

मा.अविनाश बागवे–तुम्ही जर हे मान्य करीत नाही तर मग हे ऑनपेपर ठेवावे.

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मी ऑनपेपर ठेवतो.

मा.अविनाश बागवे–आपण कधी ठेवणार आहात?

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–ती फाईल मा.अति.महा.आयुक्त, बकोरिया साहेबांकडे पेन्डींग आहे.

मा.अविनाश बागवे–मा.अति.महा.आयुक्त साहेब, आपल्याकडे हे प्रकरण का पेन्डींग आहे?

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा, मा.अति.आयुक्त साहेब यांनी ती फाईल मागील मंगळवारी मा.मुख्यलेखापाल यांच्याकडे पाठविलेली आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–आता मा.मुख्यलेखापाल यांनी सुध्दा ती फाईल आपल्याकडे पाठविली आहे आणि आता हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, मी या विषयाबाबत, १०० टक्के मा.लोकआयुक्त आणि कोर्टमध्ये जाणार आहे. त्यामुळे याबाबत ऑन रेकॉर्ड माहिती देऊ द्यावी. मला ते मिनिटीस हवे आहेत. जर ते अहवाल देत नसतील. तर हे मिनिटीस तरी द्यावेत. यामध्ये त्यांनी अशी माहिती द्यावी की, हे बिल किती रक्कमेचे आहे? यामध्ये किती सेवक आहेत? आम्ही याबाबत ४ ते ५ प्रश्न विचारले होते आणि मग अधिकारी त्यांची माहिती का देत नाहीत?

श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मी सगळया प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, यांना जर ६०० ते ७०० लोकांना बिले द्यायची असतील आणि त्याबाबत आम्ही स्पष्ट असे विचारले होते की, कामगार निहाय पी.एफ आणि इ.एस.आय.बाबत जे पैसे भरले आहेत आणि त्याचे रेकॉर्ड असेल तर दाखवावे आणि त्यांची नावे व क्रमांक द्यावेत, त्यामध्ये मा.स्थायी समितीने किती सेवकांची मान्यता दिली होती? आणि ते बिल किती सेवकांचे आहे? या दोन गोष्टीबाबत माहिती द्यावी.

मा.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा,मा.स्थायी समितीची मान्यता देताना, ऑक्टोंबर २०१४ मध्ये टेंडर लावले होते. त्या टेंडर मध्ये आमच्याकडे ऑक्टोंबर २०१४ रोजी १०८६ लोक कामाला होते. त्या अनुषंगाने आम्ही ११०० लोकांचे टेंडर लावले होते.
मा.अविनाश बागवे–मा.स्थायी समितीने किती लोकांसाठी मान्यता दिली होती?
मा.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–११०० प्लस रिक्वॉयरमेंट नुसार जेवढी जादाची संख्या लागेल ती. मार्च २०१४ ते दि.३१ मार्च २०१५ पर्यंत आमच्याकडे जवळजवळ ६४३ लोकांसाठी मागण्या आल्या. दि.१ एप्रिल २०१५ ते आता दि.१९/१०/२०१५ पर्यंत आमच्याकडे ६०६ लोकांसाठी डिमांड आल्या म्हणजे टोटल जवळजवळ १२०० लोक प्रत्येक खात्याकडून रिक्वॉयर्ड आहेत.
मा.अविनाश बागवे–म्हणजे ११०० प्लस.
श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–होय,११०० प्लस.
मा.अविनाश बागवे–११०० प्लस आणि हे जे ६०० सांगत आहात.
श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–६०० एप्रिल नंतर, एप्रिल पूर्वी जी मागणी आली.
मा.अविनाश बागवे–यामध्ये खातेप्रमुखांची पत्रे आहेत का?
श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–होय, खातेप्रमुखांची पत्रे आहेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–११०० प्लस १२००.
श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–होय, तो सगळा डेटाबेस तयार करण्याचे काम चालू आहे. ३० ते ४० पत्रांचा डेटाबेस बाकी आहे.
मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, आपण एक गोष्ट लक्षात घ्या की, प्रत्येक खात्याचे वेगळे बजेट होते. पाणी पुरवठा विभागासाठी सुरक्षारक्षक पुरविणे, उद्यान खात्याचे वेगळे, स्टेडियमचे वेगळे, मनपा मुख्य इमारतीचे वेगळे बजेट होते. या सगळयांचे २ ते ३ कोटी रू.चे वेगवेगळे बजेट होते. प्रशासनाने आपली अक्कल लढविली की, १५ कोटी रू.चे एकत्र टेंडर लावले. याबाबत विचारणा केली असता, हे प्रशासनाच्या सोयीसाठी केले आहे असे सांगण्यात आले आणि काम देताना, परत दोन ते तीन कोटी रू.ची कामे विभागून देण्यात आली याबाबत हे असे का तर एकाचीच मोनोपल्ली होऊ नये. हे काय चालले आहे? यांना असे वाटले की, एकत्र करायचे आणि यांना असे वाटले की, एकत्र करायचे. हे असे करू शकतात का? या विषयाला जवळजवळ १ महिना झाला, मा.नगरसचिव, हा विषय कधी आला होता? याची माहिती द्यावी.
मा.नगरसचिव–मा.अध्यक्षा, हा विषय २२/९/२०१५ रोजी आला होता.
मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, त्यांच्याकडे एवढा वेळ होता तर?
मा.सौ.मुक्ता टिळक–खरोखर २२०० सुरक्षारक्षक आहेत का? हे कधी आपण तपासले आहे का?
मा.अविनाश बागवे–आपण जर एकत्र करायचे असे म्हणत असू तर एकाच व्यक्तीस टेंडर द्यायला पाहिजे. परंतु यांनी ते टेंडर विभागले. त्यानंतर त्यांनी यामध्ये ४ टेंडरला मान्यता दिली आणि त्यावेळी मा.स्थायी समितीने आणखी एक वाढविले. हे असे करता येत नाही. तरी ठीक आहे की, केले आणि त्यानंतर मा.महा.आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आले. हे केल्यानंतर सुध्दा जी ११०० ची संख्या होती ती ११०० इतकी ठेवली पाहिजे होती. ही संख्या वाढविली कशी काय? ही संख्या कोणाच्या अधिकारात वाढविली? आम्ही जे प्रश्न उपस्थित केले की, बिलांवर कोणाच्याही सह्या नाहीत. ते तुम्ही आम्हाला दाखवा आणि मग ही मान्यता घ्या. आम्ही इथे छातीठोकपणे सांगत आहोत की, १८ नव्हेतर २८ कोटी रू.घ्यावेत आणि सेवकांचे पगार द्यावेत.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–मा.मुख्यसभेने मान्यता दिली नव्हती का?
मा.अविनाश बागवे–होय, त्यावेळी मा.मुख्यसभेने तो विषय फेटाळला होता.
श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–सर, तो विषय वर्गीकरणाचा होता आणि कालापव्य झाला होता.
मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, मा.मुख्यसभेस ६,६ महिने विषय पेन्डींग राहतात.
मा.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–सर,आपण बोलत आहात परंतु आमची बाजू क्लेअर आहे. हे सगळे कागदावर आहे. आपण १८०० सेवक म्हंटलात परंतु आम्ही १८०० सेवक घेतलेच नाहीत. आज रोजी सुध्दा आमच्याकडे १६०० सेवक आहेत. यामध्ये १२०० ची मागणी आहे.
(सभागृहात गोंधळ होता)
मा.अविनाश बागवे–ऑन अन एव्हरेज नव्हे, आपली बिले स्पेसिफिक असतील.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्ष, आपण हे वर्गीकरण कशातून मागत आहोत?
श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–आपण सगळया खात्यांना वर्गीकरणाबाबत कळविले होते आणि सगळयांना त्यांची संख्या सुध्दा कळविली होती. पण कोणीही हे वर्गीकरण दिले नाही.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आता हे वर्गीकरण कशामधून मागत आहात?
श्री.संतोष पवार,(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा, आम्ही हे वर्गीकरण अखर्चित रक्कमेमधून मागत आहोत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.सभागृहनेते आपल्याकडे असा विषय झाला होता की, अखर्चित मधून मा.सभासद यांचेसुध्दा विषय मान्य करायचे नाहीत. हे आपण करणार आहोत का? आपण हे देणार आहात का?
मा.राजेंद्र शिळीमकर–कामगारांना मिळाले नाहीतर उपासमार होईल.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण धोरणात्मक विषयावर बोलत आहोत.
मा.श्रीकांत जगताप–आपण असे विषय केलेले आहेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते विषय मा.मुख्यसभेने केलेले नाहीत.

मा.अविनाश बागवे–हा विषय अत्यंत चुकीचा होईल.

श्री.भोसेकर,प्र.मुख्यसुरक्षा अधिकारी–यामध्ये दुसरा एक विषय आहे की, आता आपण कॉन्ट्रक्टरला ऑलरेडी जूनपर्यंत पेमेंट दिले आहे. जूनपर्यंत त्याने इनव्हेस्ट केलेले कर्मचाऱ्याचे पगार व्यवस्थित केले आहेत. त्यामध्ये सगळे इन्शुरन्स आणि पी.एफ.चे पैसे व्यवस्थित कापून घेतले आहेत.

मा.अविनाश बागवे–आम्हाला हे तीन वर्षापासूनचे दाखवावेत.

(सभागृहात गोंधळ होता)

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते आपल्याला दोषी धरणार आहेत.

श्री.भोसेकर,प्र.मुख्यसुरक्षा अधिकारी–मा.अध्यक्षा, आता प्राब्लेम असा आहे की, ठेकेदाराने इन्व्हेस्टमेंट केलेली आहे आणि त्याला जर पुढची बिले व्यवस्थित दिली नाहीत तर, कदाचित पगाराला प्रॉब्लेम होईल.

मा.अविनाश बागवे–श्री.भोसेकर साहेब, सगळ्या खात्यामध्ये ठेकेदार तसेच करतात. सुरूवातीला ते इनव्हेस्ट करतात, कामे करतात आणि नंतर बिले घेतात. ते व्यवसाय करण्यासाठीच असतात.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–नाही, आमचा यामध्ये विरोध आहे. तुम्ही या विषयावर मतदान घ्यावे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ठीक आहे.

मा.अविनाश बागवे–यामध्ये माझ्या एकट्याचे मतदान असले तरी चालेल आणि मी हा विषय घेऊन मी न्यायालयात जाणार आहे.

मा.नगरसचिव–हा विषय दाखल करून मान्य करणेस विरोध असल्यामुळे मी या विषयावर मतदान घेत आहे. मी पुन्हा एकदा विषय वाचून दाखवितो की, ''विषय क्र.११८६, दि.२२/९/२०१५ चा..''

मा.अध्यक्षा–मा.नगरसचिव, आपण मतदान थांबवावे, यामध्ये सदरची रक्कम अखर्चित मधून देऊ नयेत म्हणून मा.महापालिका आयुक्त यांनी निगेटीव्ह अभिप्राय दिला आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–तुम्ही त्यांना कशातूनही पैसे द्यावेत.

मा.अध्यक्षा–हे किती दिवसांपासूनचे आहे !

(सभागृहात गोंधळ होता)

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षा, हा प्रशासनाचा प्रश्न आहे आणि तुम्ही त्यांच्याकडून कामे करून घेता मग त्यांना पैसे द्यावे लागणार आहेत.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–मा.अध्यक्षा,त्यांना पैसे द्यावे लागणार आहेत.

मा.अध्यक्षा–ही रक्कम अखर्चित मधून देऊ नये, म्हणून मा.महापालिका आयुक्त यांनी याबाबत निगेटीव्ह अभिप्राय दिला आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–मग ही रक्कम कशामधून देणार आहात? हे पैसे दिले पाहिजेत.

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षा, ही त्यांची जबाबदारी आहे हे कोठून द्यायचे ? हे त्यांनी ठरविले पाहिजे.

मा.अध्यक्षा–आता नुकतेच प्रशासनाने स्वच्छ संस्थेचे पैसे कसे दिले? यामध्ये आपण ४ कोटी रूपयांची जुनी देणी दिली आहेत.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–याबाबत मा.मुख्यपाल मॅडम माहिती देतील.

मा.राजेंद्र शिळीमकर– आपण स्वच्छ संस्थेचे ४ वर्षापूर्वीचे पैसे दिले आहेत. मा.महापालिका आयुक्त साहेबांना ते पैसे कसे देता आले?

मा.अविनाश बागवे–आता सेवकांबद्दल चर्चा चालू आहे. सर्व मा.सभासद, दिवाळी, दिवाळी असे सांगत आहेत. मग आपण हा विषय मान्य केल्यानंतर त्यांना किती पैसे मिळतील? याबद्दल माहिती द्यावी.

मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये जे काही नियमाप्रमाणे असतील ते सर्व कामगारांना द्यावेत.

श्री.संतोष पवार(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा, त्यांना दि.७ नोव्हेंबर पूर्वी बोनस आणि त्यांच्या मिनिमम वेजेस नुसारचे पैसे देण्यात येतील.

मा.अविनाश बागवे–त्यांना दिवाळीचा बोनस किती मिळणार आहे?

श्री.संतोष पवार(सुरक्षा अधिकारी)–मा.अध्यक्षा, त्यांना दिवाळीचा बोनस, ३५०० रू.इतका मिळेल. ज्यांचे ३११ दिवस भरले आहेत, त्यांना ३५०० रू.इतका बोनस मिळेल. आपण तेवढाच देऊ केला आहे. तेवढा सगळा त्यांना मिळणार आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये आपल्याला मागील वर्षाचे देणे द्यावे लागत असल्यामुळे यावर्षी प्रॉब्लेम झाला आहे म्हणजे हे दरवर्षी हे असे वाढत जाणार. मा.अति.महा.आयुक्त, बकोरिया साहेब, यामध्ये एक विषय असा आहे की, आपल्याला खरोखरच २२०० सुरक्षारक्षकांची आवश्यकता आहे का? येथून हा विषय सुरू करावयाचा आहे कारण इतके सुरक्षारक्षक असूनही उद्यानांमध्ये चोऱ्या होत आहेत, महापालिका भवनामध्ये चोऱ्या होत आहेत.

श्री.भोसेकर, प्र.सुरक्षाप्रमुख–मा.अध्यक्षा, मी माहिती देतो की, आपल्याकडे २२०० ची मागणी आहे आणि हे जे १२०० बद्दल बोलले त्याची फक्त रिक्वॉयरमेंट आली आहे आपण ते सुरक्षारक्षक दिलेले नाहीत.

मा.सौ.मुक्ता टिळक–आता आपल्याकडे किती सुरक्षारक्षक आहेत?

मा.अविनाश बागवे–आता, आपल्या बिलामध्ये किती सुरक्षारक्षक आहेत?

श्री.भोसेकर,प्र.मुख्य सुरक्षाअधिकारी–यामध्ये १६०० सुरक्षारक्षक आहेत आणि हे ऑगस्ट अखेरपर्यंतचे आहेत.

मा.अविनाश बागवे–तेच आहे की, ११०० ची मान्यता घेऊन १६०० सुरक्षारक्षकांचे बिल आहे. आम्ही हेच सांगत आहोत.

मा.सौ.मुक्ता टिळक–मा.महापौर, यांच्या बंगल्यातून टी.व्ही.चोरीला जातो, तेव्हा सुरक्षारक्षक काय करतात?

मा.अविनाश बागवे–आमच्या प्रभागामध्ये देखील शाळा सुरू असताना, १३ ए.सी.चोरीला गेले आहेत.

मा.राजेंद्र शिळीमकर–तो विषय, शिक्षण मंडळाच्या शाळेचा आहे. तिथे शिक्षण मंडळाचे शिपाई असतात.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–मा.अध्यक्षा, आपल्याला गरीब कामगारांचे पगार करावयाचे आहेत, त्यामुळे हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–मा.अध्यक्षा, इथे गरीबांचे पगार अडविण्याचा विषय नाही. माझा म्हणण्याचा मुद्दा असा आहे की, एवढे सुरक्षारक्षक असूनही अशा घटना घडत आहेत त्यावर काय करणार आहात?
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–मा.नगरसचिव, या विषयावर मतदान घ्यावे.
मा.नगरसचिव–विषय क्र.११६८ दि.२२/९/२०१५ चा फेरविचार करून मूळ विषय मान्य करावयाचा आहे आणि या विषयाला विरोध असल्यामुळे मी या विषयावर मतदान घेत आहे.
अनुकूल–१०
प्रतिकूल–१
**निर्णय–**सदरचा विषय, बहुमताने दाखल करून मान्य करण्यात आला.

**विषय–**

मा.चेतन तुपे यांचे र.रू.१ कोटी चे वर्गीकरण

मा.अध्यक्षा–हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावयाचा आहे, असा आमचा आग्रह आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या विषयाबाबत माहिती घ्यावयाची आहे.
मा.अविनाश बागवे–तुम्ही माहिती घेण्यासाठी ३ ते ४ आठवडे घेता आणि मग त्यामुळे प्रशासन त्यांच्या मर्जीनुसार काम करते. हा विषय कार्यपत्रिकेवर घेण्यास आमचा विरोध आहे. हा विषय मान्य करावा अन्यथा, या विषयाबाबत मतदान घ्यावे.

<u>**कार्यपत्रिकेवरील विषय**</u>

विषय क्र.१४४१
मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, हा विषय मान्य करावा.
मा.अध्यक्षा–हा विषय मा.सभासदाचा असून याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी.
मा.अविनाश बागवे–यामध्ये प्रशासनाने माहिती देताना आमची विनंती आहे की, यामध्ये शासनाची तरतूद होती की, डेव्हलमेंट टी.डी.आर.आणि आपल्या डी.सी.रूल्स मध्येही तरतूद आहे मग आपण हे इंम्पिलिमेंट का करीत नाही? एच.सी.एम.टी.आर.च्या रस्त्याबाबत अनेकवेळा सभागृहामध्ये प्रश्नोत्तरे होतात. त्याबद्दल चर्चा होते मग आपण हे ताब्यात घेऊन हे डेव्हलप का करीत नाही? तसेच ही अशी तरतूद आहे की नाही? याचा सुध्दा करावा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हे मान्य करायला काही हरकत नाही.
मा.सौ.मुक्ता टिळक– यामध्ये एन.२.४.६ हे सुध्दा समजावून सांगा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–या विषयाबद्दल माहिती द्यावी.
मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–मा.अध्यक्षा, एन.२.४.६ यामध्ये तरतूद अशी आहे की, एखादे रिर्झेवेशन असेल किंवा एखादा रस्ता असेल आणि त्याचा जो मूळ मालक आहे त्याने तो डेव्हलप करून कार्पोरेशनच्या ताब्यात दिला तर, आपण डेव्हलपमेंट जागेबद्दल आपण एक टी.डी.आर.देतो. प्लस जी ॲडीशनल डेव्हलपमेंट करतो त्या बदल्यात सुध्दा टी.डी.आर.द्यायची प्रोव्हिजन त्यामध्ये आहे. परंतु त्यामध्ये अडचण अशी आहे की, त्यामध्ये असे म्हंटले आहे की, इक्कवीव्हॅलेन्ट टी.डी.आर.द्यावा. इक्कवीव्हॅलेन्ट म्हणजे किती? या संदर्भात आपण अनेक वेगवेगळ्या लोकांचे गाईडन्स घेतले. मध्यतंरी गोदरेज व्हाईस व्हर्सेस मुंबई महानगरपालिका असा एक हायकोर्टाचा निकाल लागला. त्या हायकोर्टाच्या निकालामध्ये त्यांनी असे सांगितले आहे की, इक्कवीव्हॅलेन्ट म्हणजे इक्कवल इन व्हॅल्यू म्हणजे आता तुम्ही जो रस्ता करीत आहात म्हणजे आपल्याला रस्ता करायला एक हजार ते बाराशे रूपये, स्के.मीटर म्हणजे स्के.फूटाला शंभर ते दोनशे रू.इतका खर्च येतो आणि कॉक्रीट रोड करायचा असेल तर फूटाला ३०० रू.इतका खर्च येतो. यामध्ये हायकोर्टाचा असा निकाल लागला की, इक्कवीव्हॅलेन्ट म्हणजे समजा ३ हजार रूपयांचा रस्ता तयार केला तर तीन हजार रूपयांचा इक्कल इन व्हॅल्यू टी.डी.आर.द्यायचा तर ३ हजार म्हणजे १ स्के.मीटर द्यायला पाहिजे पण हायकोर्टाचा असा निकाल लागला की, यामध्ये इक्कल टू म्हणजे समजा की, एक स्के.मीटरचा रस्ता तयार केला तर त्याला एक स्के.मीटरचा टी.डी.आर.द्यावा आणि त्याला ३०० रू.स्के.फूट इतका खर्च येतो आणि त्याला ३ हजार स्के.फूटाचा टी.डी.आर द्यायचा. या संदर्भात क्रेडाईचे लोक हायकोर्टात गेले आहेत की, आम्हाला डेव्हलपमेंट टी.डी.आर.द्यावेत म्हणून ते कोर्टात गेले आहेत. त्यामध्ये आपण असे मांडले आहे की, हा जो इक्कल जो आहे तो देता येत नाही. आपल्याकडे इक्कवीव्हॅलेन्ट असे म्हंटले आहे म्हणजे इक्कल इन व्हॅल्यू पाहिजे म्हणजे ३०० रू.च्या जागेला ३ हजार रूपयांचा टी.डी.आर.द्यायचा का? तर तो द्यायचा नाही म्हणून आपण आताचे जे नवीन डी.सी.रूल्स तयार केले आहेत. त्यामध्ये आपण असे म्हंटले आहे की, टी.डी.आर.कसा द्यायचा? तर स्पेसिफिक क्लेअर प्रोव्हिजन आपण केली आहे. समजा एखादी डेव्हलपमेंट करायची आहे, एखादी शाळा, एखादी वर्ग खोली बांधायला ३ लाख रू.इतका खर्च येत असेल तर ३ लाख रूपये डिव्हायडेड बाय तेथील रेडीरेकनरचा लॅण्ड कॉस्ट एवढाच टी.डी.आर.त्याला द्यायचा.
मा.राजेंद्र शिळीमकर–डबल का?
मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–कन्स्ट्रक्शनल,हा डेव्हलपमेंट टी.डी.आर. आहे. रेग्युलर टी.डी.आर.नाही. डेव्हलपमेंटेड टी.डी.आर.म्हणजे एखादे आरक्षण आहे आणि ते डेव्हलप केले तर त्यामधीलच ॲडीशनल टी.डी.आर.द्यायचा, आपण अशी

डी.सी.रूल्स मध्ये प्रोव्हिजन केली आहे. ते डी.सी.रूल्स जोपर्यंत मंजूर होत नाहीत. तोपर्यंत आपल्याला हे राबविता येत नाही. कारण इक्कल इन व्हॅल्यू डेव्हलपरचे, विकसकाचे किंवा मालकांचे म्हणणे असे आहे की, जरी ३०० रू.चा रस्ता केला तरी तुम्ही आम्हाला ३ हजार रूपयांचा टी.डी.आर.द्यावा, तसेही हा मॅटर कोर्टात आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–जस्टीफाय होत नाही.

मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता–जस्टीफाय होत नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपण असे म्हंटले आहे की, कॉस्ट डिव्हायडेड बाय रेडीरेकनर.

मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता–रेडीरेकनर आणि तेथील एरिया ऑफ प्लॉट म्हणजे तेवढाच येईल.

मा.सौ.मुक्ता टिळक–हे त्यांना द्यायचे, हा फार्म्युला शासनाने घेतला आहे का?

मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता–हा फार्मुला आपल्या डी.सी.रूल्स मध्ये टाकला आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये असे म्हंटले आहे की, महाराष्ट्र शासनाने नुकतान फार्मुला पारित केला आहे. तो कोणता आहे?

मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता–हा जो फार्म्युला आहे. आता त्यावर महाराष्ट्र शासनाने २ एफ.एस.आय.चे सजेशन ऑब्जेक्शन मागविले आहेत. तो जर फायनल झाला तर तो आपल्याला अप्लॉय करता येईल. तो अजून फायनल झालेला नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक–तो काय आहे?

मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता–आपण जी प्रोव्हिजन डी.सी.रूल्स मध्ये केली आहे तशीच प्रोव्हिजन शासनाने केली आहे म्हणजे डेव्हलपमेंट टी.डी.आर.मध्ये लॅण्ड कॉस्ट डिव्हायडेड बाय रेडीरेकनर.

मा.राजेंद्र शिळीमकर–आता डी.पी.फायनल होईल.

मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता–तोपर्यंत आपली प्रोसेस होईल.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.

मा.सौ.मुक्ता टिळक–तुम्ही सांगत आहात तो हाच डी.सी.रूल आहे का?

मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता–हो.

मा.सौ.मुक्ता टिळक–हा नवीन मध्ये प्रस्तावित केला आहे की, पहिल्या डी.सी.रूल्स मध्येही होता.

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–पहिल्या नियमामध्ये होता आता आपण केला आहे आणि शासनानेही तोच घेतलेला आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–महानगरपालिकेच्या अंतर्गत जो रिंगरोड आहे त्या रिंगरोडचा हा विषय आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–नाही, जरी हा विषय मान्य केला तरी डी.पी.मान्य होईपर्यंत, डी.सी.रूल्स मान्य होईपर्यंत हे काम करू शकाल का? याबद्दल माहिती द्यावी.

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–यामध्ये दोन पॅरलल प्रोव्हिजन आहेत. हे आपल्या डी.सी.रूल्स मध्ये सुध्दा आहे आणि शासनाने टी.डी.आर.साठी वेगळी नियमावली प्रसिध्द केली आहे त्यावर सजेशन ऑब्जेक्शन झालेत फायनल शासनाकडे गेले आहे. शासन सुध्दा निर्णय करेल. जे आधी होईल त्याप्रमाणे करू. आपल्या डेव्हलमेंटचे काम आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–होय, मग ते कंडीशनल मान्य करायला पाहिजे, असे माझे म्हणणे आहे.

मा.अविनाश बागवे–शासनाचे सुध्दा तेच म्हणणे आहे आणि आपलेही तेच म्हणणे आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–असू द्या

मा.राजेंद्र शिळीमकर–डी.सी.रूल्स मध्ये अनेक गोष्टी आहेत, त्या सगळया घ्याव्यात.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–चांगले होत असेल तर होऊ द्यात.

मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा. शासनाचे जे मान्य व्हायचे आहे ते सुध्दा होईल.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ते करतील.

मा.सौ.मुक्ता टिळक–त्यामध्ये आम्ही एक उपसूचना देत आहोत.

मा.राजेंद्र शिळीमकर–जोपर्यंत शासन मान्यता देत नाही तोपर्यत.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ते होत आहे आणि त्यामध्ये अजून काही करायची आवश्यकता नाही.

मा.राजेंद्र शिळीमकर–डी.सी.रूल्स मध्ये असे अनेक विषय आहेत आणि ते सुध्दा या मान्यतेमुळेच थांबले आहेत.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–तुम्ही ते विषय आणावेत आणि ते सुध्दा मान्य करायचे असतील तर आपण मान्य करू.

मा.सौ.मुक्ता टिळक–नाही, मा.वाघमारे साहेब हे टेक्नीकली तरी कसे योग्य होईल? याबद्दल सांगावे. अजून डी.पी.मान्य झालेला नाही, अद्याप डी.सी.रूल्स तयार नाहीत. आजच्या वर्तमानपत्रात अशी बातमी आहे की, डी.सी.रूल्स तयार झाल्यानंतर त्याला शासनाची मान्यता मिळणार आहे आणि त्याला सजेशन ऑब्जेक्शनकडे पाठवायची वेळ येणार.

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–यामध्ये दोन पॅरलल गोष्टी आहे एकतर आपले डी.पी.चे काम चालू आहे. त्यातील डी.सी.रूल्समध्ये ही प्रोव्हिजन होती. त्याबरोबरच शासनाने एक डबल टी.डी.आर.म्हणजे नवीन लॅण्ड ॲक्वीझिशन ॲक्ट झाला, राईट टू फेअर कंम्पसेशन ॲक्ट, त्यामध्ये डबल कंम्पसेशन द्यावे लागले. त्यामुळे शासनाने प्रत्येक मिळकतीला दुप्पट टी.डी.आर.द्यावा, अशा पध्दतीची प्रोव्हिजन केली आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–शहरी विभागात.

मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–होय, शहरी विभागासाठी दुप्पट. त्यामध्ये सगळया महानगरपालिकांसाठी कॉमन ३७(१) अे खाली सजेशन ऑब्जेक्शन मागविले आहे आणि त्याचे सुध्दा हे फायनलायझेशन आहे. जे लवकर होईल ते होईल आणि हे महिन्याभरामध्ये होईल.

मा.अविनाश बागवे–सर, हे आपल्या जुन्या डी.सी.रूल्समध्ये सुध्दा आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–लवकर काहीतरी विषय आणावा, सभासदाना क्रेडीट मिळावे
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय चांगला आहे.
मा.अविनाश बागवे–हा महानगरपालिकेचा विषय आहे, यामध्ये एखाद्या सभासदाचे काय आहे?
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये उपसूचना देऊ.
मा.राजेंद्र शिळीमकर–शासन मान्यता देत नाही आणि आपण काहीतरी वेगळा विषय मान्य करायचा?
मा.अविनाश बागवे–ऑलरेडी जुन्या डी.सी.रूल्स मध्ये
मा.सौ.मुक्ता टिळक–सरकार जोपर्यंत डी.पी.ला मान्यता देत नाही तोपर्यंत हा विषय का मान्य करायचा?
मा.राजेंद्र शिळीमकर–आपण वेगळे विषय का मान्य करायचे?
मा.अविनाश बागवे–आता नवीन डी.सी.रूल्स होत आहे आणि त्यामुळे आपण जुन्या डी.सी.रूल्सची अंमलबजावणी होत नाही, अशातील भाग नाही आपण ती अंमलबजावणी करीतच आहोत.
मा.सौ.मुक्ता टिळक–हे जुन्या डी.सी.रूल्समध्ये कुठे आहे?
मा.अविनाश बागवे–आहे.
मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–हे मंजूर करायला हरकत नाही. तोपर्यंत आपल्या मा.मुख्यसभेमध्ये देखील मंजूर होईल.
(सभागृहात गोंधळ होता)
मा.सौ.मुक्ता टिळक–हे जुन्या डी.सी.रूल्समध्ये नाही, असे आता सांगितले आहे.
मा.अविनाश बागवे–ते आता मॉडिफिकेशन करीत आहेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्याला बेस आहे.
मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–जुनी तरतूद आहे. हा सक्सेचा विषय आहे. तोपर्यंत डी.सी.रूल्स मंजूर होईल आणि आता आपल्याला आधार आहे. डी.सी.रूल्समध्ये प्रोव्हिजन आहे.
मा.अविनाश बागवे–हा खरोखर चांगला विषय आहे. यामुळे शहरातील मोठमोठे रस्ते तयार होतील.
मा.सौ.मुक्ता टिळक–अशा पध्दतीने, जर का शासनाने जुने काही डी.सी.रूल्स बदलले नाहीत. समजा तुम्ही पाठविले आणि शासनाने जुने रूल्स काही बदलले नाहीत. मग तसेच आपण शहरामध्ये सगळीकडे बांधकामांना कंटीन्यू करणार आहे का?
मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–मा.अध्यक्षा, आपली जी उत्पन्नाची साधने आहेत. ती दिवसेदिवस कमी होत चालली आहेत किंवा एल.बी.टी.रद्द झाला आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–शासनाकडून एल.बी.टी.चे पैसे येत आहेत.
मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–आपला ८८ हजार कोटी रू.चा सी.डी.पी.आहे. कंपाऊडींग फी हे आपल्या उत्पन्नाचे साधन असू शकत नाही आणि फक्त दंड लावायचे हे काही आपले उत्पन्न होऊ शकत नाही. ईज ऑफ बिझनेस पाहिजे. लोकांना सोपे आणि परवडले पाहिजे. पण यामध्ये वेगवेगळे उत्पन्न, शहराची विकास कामे करण्यासाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टीसिपेशन किंवा इतर माध्यमातून हे आपल्याला करणे आवश्यक आहे. तशीच ही डेव्हलमेंट टी.डी.आर.ची चांगली प्रोव्हिजन आहे आणि खराडी व बाणेर येथे पी.पी.पी.च्या माध्यमातून चांगली डेव्हलपमेंट झाली. तर हे आपण इनकरेज करायला पाहिजे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हळूहळू महानगरपालिकेची स्वायक्तता संपायला लागली आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.
मा.राजेंद्र शिळीमकर–मग, आम्ही शहरातील वाडे आणि रस्तारूंदीकरणाचा एक विषय आणतो.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–तुम्ही तसे विषय द्यावेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये असे म्हंटले आहे की, महाराष्ट्र शासनाने फॉर्म्युला पारित केला आहे म्हणजे महाराष्ट्र शासनाने तसा जी.आर.काढला आहे का? याबद्दल माहिती द्यावी.
मा.प्रशांत वाघमारे,नगरअभियंता–जी.आर.मध्ये सजेशन ऑब्जेक्शन मागविलेले आहे. मागील डी.सी.रूल्स मध्येही प्रोव्हिजन आहे आणि हे दोन्हीकडे आहे. मॅडम, हा चांगला विषय आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–तुम्ही हे सांगत आहात परंतु यासाठी मा.महा.आयुक्त साहेब या गोष्टीला मान्यता देत नाहीत. त्याचे म्हणणे असे आहे की, यामध्ये जोपर्यंत राज्यशासनाच्या इन्स्ट्रक्शन्स येत नाही, तोपर्यंत असे करता येत नाही.
मा.अविनाश बागवे–यामध्ये अशी उपसूचना द्यावी की, मा.महा.आयुक्त यांची मान्यता घेऊन अंमलबजावणी करावी.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय सरळसरळ आहे आणि आम्हाला हा विषय मान्य करायचा आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी,मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–आम्ही उपसूचना स्वीकारणार नाही.
मा.अध्यक्षा–प्रशासनाने पॉझिटीव्हीटी दाखविली आहे मग हा विषय करण्यास कोणती हरकत आहे?
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.नगरसचिव–विषय क्र.१४४१ पुढील सभेत घ्यायचा आहे का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–नाही, हा विषय मान्य करावयाचा आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–या विषयासाठी मतदान घ्यावे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ठीक आहे, हा विषय मान्य करायचा आहे आणि मान्यतेसाठी मतदान घ्यावे.
मा.नगरसचिव– हा विषय जर पुढे घ्यायचा असेल तर, पहिल्यांदा विषय पुढे घेण्यासाठी मतदान घ्यावे लागेल.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–आपण कशावरही मतदान घ्या.

मा.सौ.मुक्ता टिळक– हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.राजेंद्र शिळीमकर–हा विषय पुढे घ्या,आपण पुढील आठवड्यात पाहू.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.
मा.अविनाश बागवे–या विषयाला तीन मा.सभासदाचा विरोध आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ठीक आहे, या विषयावर मतदान घ्यावे.
मा.नगरसचिव–हा विषय पुढील सभेत घेणेसाठी विरोध झाल्यामुळे मी यावर मतदान घेत आहे.
अनुकूल–३
प्रतिकूल–१०, असे मतदान झाले आहे त्यामुळे हा विषय पुढे जाऊ शकणार नाही.
मा.नगरसचिव–सदरचा विषय मंजूर करणेस कोणाचा विरोध आहे का?
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१४४२
मा.अविनाश बागवे–या विषयाबाबत अभिप्राय घ्यावा.
निर्णय–सदर विषयाबाबत मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.
विषय क्र.१४४३
मा.अध्यक्षा–या विषयाबाबत अभिप्राय घ्यावा.
निर्णय–सदर विषयाबाबत मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.
विषय क्र.१४४४
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.
मा.नगरसचिव–यामध्ये काय मान्य करावे?
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये अशी माहिती द्यावी की, भविष्यामध्ये असे विषय आले तर मान्य करणार आहात का?
मा.नगरसचिव–मग मूळ विषय मान्य करायचा आहे का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मूळ विषय मान्य करावा.
मा.अविनाश बागवे–यामध्ये थोडेस नगरसचिव कार्यालयाकडून सुध्दा पध्दत..
मा.नगरसचिव–साहेब, आमच्या हातात काहीही विषय नाही. आम्हाला जर मा.महापौर साहेबांकडून लेखी पत्र आले तर आम्हाला ते करावे लागते.
मा.अविनाश बागवे–मग अशावेळी ते पत्र, तुम्ही मा.सभागृहनेते,मा.पक्षनेते यांच्या निदर्शनांस आणावे.
मा.राजेंद्र शिळीमकर–आपण सांस्कृतिक भवनाचा महोत्सव केला आहे का?
मा.नगरसचिव–होय.
मा.राजेंद्र शिळीमकर–भवनांचे वाढदिवस होऊ लागले तर?
मा.सौ.मुक्ता टिळक–मी याबाबतच विचारणा केली आहे की, पुढील काळामध्ये जर प्रत्येक भवनांचे वाढदिवस करण्याची वेळ आली तर?
मा.अध्यक्षा–याबाबत चौकशी केली होती त्यावर असे सांगण्यात आले की, बालगंधर्व रंगमंदिराचा करण्यात येतो.
मा.नगरसचिव–दुसऱ्यांकडून होत असेल तर तो आम्हाला माहिती नाही परंतु आमच्या कार्यालयाकडून असे करण्यात येत नाही. आपण फक्त २००५ मध्ये रिन्यूव्हेशन केले होते.
मा.अविनाश बागवे–फक्त यापुढे असे होऊ देऊ नये.
मा.नगरसचिव–मी आपल्या भावना, मा.महापौर साहेबांपर्यंत पोहचवितो.
मा.अविनाश बागवे–आपण तसे लेखी सादर करावे.
मा.अध्यक्षा–आपण आता हा विषय मंजूर करू आणि तसा ठराव देखील मंजूर करू.
मा.नगरसचिव–मा.अध्यक्षा, आपल्याला हे यामध्येच ॲड करता येईल.
मा.अविनाश बागवे–यापुढे कोणत्याही भवनाचा किंवा इमारतीचा..
(सभागृहात गोंधळ होता)
मा.बापूराव कर्णे गुरूजी–तसा यामध्ये उल्लेख करावा.
मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये आमच्या पक्षाचा विरोध राहील.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–मा.सभासद यांना निर्णय वाचून दाखवावा.
मा.नगरसचिव–फेरविचार करून मूळ विषय मान्य, यापुढे कोणत्याही भवनाचा वर्धापनदिन करू नये.
मा.अध्यक्षा–यामध्ये, वर्धापन दिन करू नये असे कसे म्हणता येईल? याबाबतच्या खर्चास मंजूरी दिली जाणार नाही, असे म्हंटले पाहिजे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–वर्धापन दिनाच्या खर्चास मंजूरी देण्यात येऊ नये, असे नमूद करावे.
मा.नगरसचिव–यामध्ये थोडी दुरूस्ती केली आहे, यापुढे कोणत्याही भवनाच्या वर्धापन दिनाचा खर्च करू नये.
मा.सौ.मुक्ता टिळक–मग महापालिका भवन, वर्धापन दिन सुध्दा येईल.
मा.नगरसचिव–तो महानगरपालिकेचा वर्धापन दिन आहे. तो भवनाचा वर्धापन दिन नाही.
मा.सौ.मुक्ता टिळक–तरी आपण भवन सजवितो.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ठीक आहे, झाले गेले विसरून जावे आणि विषय मंजूर करून घ्यावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–नाही ते काहीतरी वेगळे आणि चुकीचे होत आहे.
मा.अध्यक्षा–यापुढे कोणत्याही भवनाच्या वर्धापनाचा खर्च मंजूर करू नये.
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये ही खास बाब म्हणून मान्य करावे.
मा.अध्यक्षा–मग ते ठराव देतानाच खास बाब म्हणून असा ठराव देतील.
मा.सौ.मुक्ता टिळक–यावर्षी, मी या निर्णयाबाबत असे सुचविते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीच्या निमित्ताने, यावर्षी फक्त विशेष बाब म्हणून हे मान्य करण्यात यावे. यापुढे कोणत्याही भवनाचा वर्धापनदिन साजरा करू नये.
मा.अध्यक्षा–आपण महापुरूषांच्या जयंती आणि पुण्यतिथी साजरी करतो.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–जयंती, पुण्यतिथी वेगळे आहे यामध्ये भवनाचा वर्धापनदिन केला आहे.
मा.नगरसचिव–यामध्ये अशी दुरूस्ती केली आहे की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने यावर्षी खास बाब म्हणून फेरविचार करून मूळ विषय मान्य, यापुढे कोणत्याही भवनाच्या वर्धापनदिनाचा खर्च करू नये.
**निर्णय**–भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने यावर्षी खास बाब म्हणून फेरविचार करून मूळ विषय मान्य, यापुढे कोणत्याही भवनाच्या वर्धापनदिनाचा खर्च करू नये.
विषय क्र.१४४५
मा.सौ.मुक्ता टिळक–या विषयाला आमचा विरोध आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१४४६
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१४४७
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१४४८
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१४४९
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१४५०
मा.सौ.मुक्ता टिळक–या विषयाची माहिती द्यावी.
श्री.सुरेश जगताप,उप आयुक्त(प.मं.कार्या.क्र.)–मा.चेअरमन महोदय, यामध्ये पूनावाला फौऊंडेशन, आपल्याला सी.एस.आर.अंतर्गत ६ गाड्या देणार आहेत आणि घरगुती वेस्ट आणि हॉटेल वेस्ट कलेक्ट करण्यासाठी त्या गाड्याचा वापर करण्यात येणार आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–नोबल सोल्युशन्स यांच्यासोबत महानगरपालिकेने जो करार केला. तेव्हा आपण गाड्यांच्या बाबतीत काय केले होते?
श्री.जगताप,उप आयुक्त(प.मं.कार्या.क्र.)–तो करार आणि हा करार वेगळा आहे. त्यामध्ये सी.एस.आर.फंडीग त्या नोबल मार्फत महापालिकेकडे रूट झालेले आहे.
मा.अविनाश बागवे–सी.एस.आर.चे कामकाज कोणाकडून पाहिले जाते? याबाबत माहिती द्यावी. मी दोन ते तीन वेळा याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला परंतु याबाबत कोणीही काहीच सांगायला तयार नाहीत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्यांनी आपल्याला फंडीग केले आहे का?
श्री.जगताप,उपआयुक्त(प.मं.कार्या.क्र.)–त्यांनी गाडया घेतलेल्या आहेत आणि ते आता मा.महापौर यांच्याकडे हॅण्डओव्हर करणार आहेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्यांनी आपल्याला फुकट गाड्या दिल्या आहेत तर मग हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–आम्हाला तो विषय मान्यच आहे. परंतु आपण नोबल कंपनीला कचरा द्यायचा आहे आणि बाकीचे सगळे नोबल कंपनीने करायचे आहे.
श्री.जगताप,उपआयुक्त(प.मं.कार्या.क्र.)–बाकी वाहतूक आणि डे टू डे मेटेनेन्स वैगेरे सगळे त्यांचे ते करणार आहेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–ते वाहतूक करणार.
श्री.जगताप,उपआयुक्त(प.मं.कार्या.क्र.)–त्या गाड्यांचा खर्च सुध्दा तेच करणार आहेत.
मा.मुकारी आण्णा आलगुडे–मा.अध्यक्षा, आपण मध्यंतरी घरोघरी कचरा गोळा करणाऱ्या स्वच्छ या संस्थेस निधी दिला होता. परंतु कुठेच स्वच्छता दिसत नाही. या संस्थेचे लोक कोठे आहेत? आपण त्यांना ४ कोटी रू.दिले आहेत आणि ते लोक कोठेच दिसत नाही.

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–सर, आपण त्यांच्या ॲग्रीमेंटबाबत लिगल ओपिनियन घेतले होते आणि त्यांचे जे मागील पेमेंटस द्यायची होती त्यासाठी त्या अकौंटसमध्ये..

मा.मुकारी आण्णा आलगुडे–मागील पेमेंट द्यायचे होते?

मा.अध्यक्षा–होय, मागील पेमेंट द्यायचे होते.

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–त्यांचे मागील ५ वर्षांचे पेमेंट द्यायचे होते. त्यामध्ये छोटी पेमेंटस आहेत, प्रत्येकी १ हजार रू.याप्रमाणे आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–रक्कम किती होत आहे?

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–ही रक्कम जास्त होते आणि आपण ती मंजूर केली आहे फक्त त्यांना देण्यासाठी जी प्रोसिजर आहे. ती अकौंटसमधून तपासून द्यायची आहे.

मा.अनिल राणे–आपण विषयपत्र आणताना असे आणतो की, मागील सर्व पेमेंट देत आहोत आणि काम न करताच त्यांना सगळे पेमेंट कसे देत आहोत? आता पुन्हा तुम्ही डॉकेट आणणार आणि तुम्ही ह्या ॲग्रीमेंटपासून देय करणार आहात का? आपण त्यांना मागील सर्व थकबाकीसह पेमेंट देत आहोत आणि पेमेंट मिळाले नाही म्हणून त्यांचे काम बस आहे. आता सुध्दा आपण ठराव केला परंतु त्यांचे काम अद्याप सुरू झालेले नाही. त्यावेळेला आपण त्यांना ठराव केल्यापासूनचे पेमेंट देणार आहोत का?

मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा ठराव करीत असताना आम्हाला असे सांगण्यात आले होते की, आम्ही काम सुरू करतो.

मा.अविनाश बागवे–याबाबत सभागृहात सुध्दा चर्चा झाली की, आपल्या ज्या एजन्सीज असतील म्हणजे आपले वॉर्ड ऑफिसेस असतील खातरजमा करून घ्यावी की, यामध्ये तेवढ्या व्यक्तींनी ते काम केले आहे किंवा नाही? आमच्या भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाच्या बाबतीत त्यांनी २५२ लोकांची यादी दिली होती आणि प्रत्यक्षात पाहणी केली तर फक्त ५६ किंवा ५२ लोकच होते.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–ते लोक दिसतच नाहीत.

मा.अविनाश बागवे–त्यामुळे तुम्ही हे बिल पाहिल्यांदा चेक करून पहावे. आपण खात्याला विचारावे, त्यांच्याकडून अभिप्राय घ्यावा आणि त्यानंतरच ते बिल द्यावे.

मा.अनिल राणे–आपण आता त्यांना पेमेंट देणार आहोत आणि प्रत्येक सेवकाला १ हजार रू.द्यावेत, असे ठरविले आहे. समजा माझ्या प्रभागात ४० सेवक काम करीत असतील आणि यांनी त्यामध्ये ५० सेवक दाखविले. त्यातील ४० सेवकांनी ३ महिन्यांपर्यंत काम केले व १० सेवकांनी कामच केले नाही, असे झाले असेल तरीसुध्दा आपण पेमेंट देत आहोत.

मा.अविनाश बागवे–तेच देऊ नये.

मा.राजेंद्र शिळीमकर–ॲव्हरेजने पेमेंट देऊ नये.

मा.अनिल राणे–ज्या दिवशी त्यांचे काम सुरू होईल, त्या दिवसापासूनच त्यांचे पेमेंट सुरू झाले पाहिजे.

मा.अविनाश बागवे–वॉर्ड ऑफिसच्या रिपोर्टच्या आधारेच पेमेंट द्यावे, असे आमचे मत आहे. सर, मुख्यसभेमध्ये तशीच चर्चा झाली की, आपण आपल्या वॉर्डऑफिस मार्फत मॉनिटरींग करून हे करावे, बिल द्यावे आणि भविष्यात सुध्दा काम करताना आपण मॉनिटरींग करावे.

मा.अनिल राणे–मागील पेमेंट बाकी होते म्हणून त्यांनी काम बंद केले होते आणि आपण त्यांना सगळी थकबाकी देत आहोत. काम न करता देत आहोत.

मा.अध्यक्षा–त्यांनी काम बंद ठेवले होते. मग आपण त्यांना थकबाकी का देत आहोत?

मा.मुकारी आण्णा आलगुडे–त्यांनी अजून काम चालूच केले नाही. हे काम बंदच आहे.

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–मा.अध्यक्षा, महोदया, यामध्ये जी थकबाकी आहे ती काही ठराविक गोष्टींची आहे. कामगारांसाठी ज्या योजना असतात त्यासाठी ६०० ते ७०० रू.आहेत, त्यानंतर गाड्या दुरूस्तीचे ६०० रू.आहेत अशी काही थोडीशीच रक्कम आहे. परंतु लोक खूप आहेत त्यांचे व्हेरीफिकेशन इतके टी.डी.एस.होत आहे. त्यांच्याकडे जे रेकॉर्ड आहे ते मागील वर्षी मा.जगताप साहेबांनी ट्राय केले की, आपण हे सगळे वॉर्डमधून तपासून घ्यावे. पण त्यावेळी आपला त्यांच्यावर कंट्रोल नव्हता त्यामुळे ते रेकॉर्ड आपल्या कोणालाही तपासता येत नाही कारण ते आपण सर्वांना माहिती नाही. पण लोक त्यांना चेहऱ्याने ओळखतात.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–असे कसे?

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–त्यामुळे आम्ही अकौंटसकडे असे ठेवले आहे की..

मा.सौ.मुक्ता टिळक–असे कसे होईल?

मा.अनिल राणे–मा.अध्यक्षा, जसे आता सांगितले आणि त्यांचे बाकीचे ॲग्रीमेंट व्हायचे आहेत म्हणून काम सुरू झाले. परंतु त्यांचे ५० रू.चे मानधन वाढले म्हणून त्यांनी सर्व फ्लॅटधारकांना पत्र लगेच पाठविले. मग काम सुध्दा तसेच करायला पाहिजे. ती प्रोसेस लगेच सुरू झाली.

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–त्यांचे ॲग्रीमेंट आता शेवटच्या टप्पामध्ये आहे. दोन तीन दिवसांत ॲग्रीमेंट झाले, एम.ओ.यु.झाला की, त्यांचे काम सुरू होणार आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–त्याआधीच दोन महिन्यांपासून त्यांनी लोकांकडून ५०, ५० रू.घ्यायला सुरूवात केली आहे. हे बरोबर आहे का?

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–ते बरोबर नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक–मग यावर कोणाचा चेक आहे?

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–आतापर्यंत आपला त्यांच्यावर कधीच चेक नव्हता आणि काहीवेळेला यापेक्षा जास्त सुध्दा काही लोक ऑलरेडी घेत आहेत. तर त्यामुळे आता आपण, यानंतर ॲग्रीमेंट झाल्यावर आपण त्यांच्यावर चेक ठेवणार आहोत आणि तेव्हापासून ते आपल्याकडून सुरू होईल.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, आता कचऱ्याबाबत जो ठराव करून पाठविला त्यामध्ये प्रामुख्याने या संस्थेचे पेपरवर्क उत्तम आहे आणि प्रॅक्टीकल झिरो आहे. ही वस्तुस्थिती आहे आणि तरीदेखील आपण त्याचे पेपरवर्क पाहून मागील पेमेंट करीत आहोत. आता सुध्दा त्यांचे काम सुरू नाही. ॲग्रीमेंट करताना, ज्यादिवशी ॲग्रीमेंट केले जाईल तेथून पुढे त्याची अंमलबजावणी केली जाईल, असा उल्लेख करा.

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–मा.अध्यक्षा, ते तसेच असणार आहे. ज्या दिवशी सही होईल आता शेवटच्या टप्प्यात आहे अकौंट डिपार्टमेंट तपासणी करीत आहे कारण त्यामध्ये काही घोटाळे राहू नयेत नंतर ऑडीटचे आक्षेप येऊ नयेत म्हणून ही तपासणी होत आहे.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–या बाबींचा उल्लेख करावा.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मला यानिमित्ताने प्रशासनाचे विशेष अभिनंदन करावयाचे आहे की, आतापर्यंत पुणे महानगरपालिकेमध्ये जे जे कचरा प्रोजेक्ट उभे राहिले ते रामभरोसे होते परंतु आता मात्र नव्याने चांगल्याप्रकारे त्यांची कोणीतरी त्या संस्थेमार्फत जबाबदारी घेत आहे की तो प्रोजेक्ट तांत्रिकदृष्टया परफेक्ट आहे. ही जबाबदारी घेऊन आता जे नव्याने मंजुरी देत आहेत ही अत्यंत चांगली बाब आहे, स्वागतार्ह बाब आहे याचे रिझल्ट चांगले मिळतील, अशी आम्हाला आशा आहे.

मा.अविनाश बागवे–सी.एस.आर.बाबतची माहिती द्यावी की, सी.एस.आर.अतंर्गत कोणत्या कंपन्यांनी आपल्याकडे अर्ज केला आहे किंवा आपल्याकडे कोणत्या कंपनीने मागणी केली आहे? आपल्याकडे सी.एस.आर.अंतर्गत किती कंपन्यांच्या नोंदी आहेत? आणि सी.एस.आर.च्या माध्यमातून आपण काय काय करू शकतो? मी ही माहिती दोन तीन वेळा मागितली होती परंतु मला ही माहिती कोणीच दिलेली नाही?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपल्याकडे जी यादी आहे, ती मा.सभासदाना द्यावी.

मा.अविनाश बागवे–कोणती लिस्ट, त्यांनी फक्त, पुणे कनेक्ट बाबतची माहिती दिली आहे. त्यामध्ये सी.एस.आर.चा काहीही संबंध नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–पुणे कनेक्टमध्ये आपल्याकडील सर्व कंपन्यांची यादी आहे. ती कदाचित मा.सभासद यांच्याकडे गेली नसेल. त्यामुळे ही लिस्ट मा.सभासद यांना द्यावी.

मा.अविनाश बागवे–मागील वेळी त्यांनी पुणे कनेक्टची एक टिपणी दिली परंतु त्यामध्ये पुणे कनेक्ट काय आहे? याबाबतची माहिती दिली होती. आम्ही असे विचारले आहे की, आपल्याकडे कोणकोणत्या कंपन्या इच्छुक आहेत? आणि त्यांच्याव्दारे आपण कोणकोणती कामे करू शकतो?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपल्याकडे ती लिस्ट आहे.

मा.अविनाश बागवे–आम्हाला ती लिस्ट दिलेली नाही. ती लिस्ट देण्याची व्यवस्था करावी.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषयाची नोंद घेण्यात यावी.

**निर्णय–** मा.महा.आयुक्त यांनी पाठविलेल्या पत्राची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१४५१

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१४५२

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१४५३

मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१४५४

मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१४५५

मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१४५६

मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१४५७

मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१४५८
मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१४५९
मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१४६०
मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१४६१
मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

मा.सौ.मुक्ता टिळक–मा.अध्यक्षा, विषय क्र.१४५८ आणि विषय क्र.१४६० बाबत, ही नक्की कोणती कामे आहेत? आपण विषय मान्य करू या. परंतु आम्ही अनेक सूचना केल्या आहेत. त्यांची कोणत्याही प्रकारे अंमलबजावणी होत नाही. नो–पार्किंग, समांतर पार्किंग करावे या सूचनांची अंमलबजावणी केली जात नाही. रस्त्यावर पांढऱ्या रंगाचे पट्टे सुध्दा मारले जात नाहीत.

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.प्र.)–मा.चेअरमन मॅडम, या वर्षामध्ये काय काय केले पाहिजे? या संदर्भात डी.सी.पी.साहेबांनी एक व्हिजन डॉक्युमेंट तयार करून, ते एरियावाईज वर्किंग करून दिला होता. त्या वर्किंग्जमध्ये काही ठिकाणी डिव्हाडर पंक्चर्स बंद करणे, पार्किंगचे लेन मार्किंग करणे, झेब्रा क्रॉसिंग करणे, काही सिग्नल्स मध्ये दुरूस्ती करणे, काही ठिकाणी फूटपाथ करणे, काही ठिकाणी लायटींगची व्यवस्था करणे अशा विविध स्वरूपाची कामे विविध ठिकाणांसाठी सुचविली आहेत. आपण डॉक्युमेंटप्रमाणे आपण वॉर्डवाईज, झोनल कमिशन ऑफिसप्रमाणे डिव्हाईड केले आहे आणि त्याप्रमाणे टेंडर काढले आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–हे असे पहिल्यांदाच झाले आहे की, यापूर्वीही असे केले आहे?

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.व प्रकल्प)–नाही, यावर्षी आपण पोलिसांनी सुचविलेल्या कामांसाठी तरतूद केली आहे आणि ते डॉक्युमेंट आपल्याकडे सादर केले आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–ही अशी छोटी कामे प्रोजेक्टसाठी न घेता, ती क्षेत्रिय कार्यालयांना करण्यास सांगावीत. कारण यामध्ये असे होते की, तुम्ही कामे करता आणि तिकडून बिले काढली जातात.

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.व प्रकल्प)–सर, डे टू डे जे साईन बोर्ड पेन्टींगचे जे काम आहे त्याच्या दोन डिव्हीजन्स केल्या आहेत. यामध्ये मुख्यखात्याने काय केले पाहिजे? आणि क्षेत्रिय कार्यालयाने काय केले पाहिजे? याबाबत मा.बकोरिया,अति.महा.आयुक्त साहेब, यांच्या अध्यक्षतेखाली दोन ते तीन बैठका झाल्या आहेत. तसेच यामध्ये कोठे, कोठे कोणकोणती कामे झाली पाहिजेत, त्याचे डिव्हीजन सुध्दा झाले आहे आणि त्याप्रमाणे टेंडर काढले आहे.

मा.अविनाश बागवे–यातील वॉर्ड ऑफिस व मुख्य खात्याच्या कामासंदर्भातील यादी आम्हाला सुध्दा द्यावी.

मा.सौ.मुक्ता टिळक–खरे पाहता हे एकत्रित करण्यास हरकत नाही आणि दुसरी बाब म्हणजे यातील कोणते काम आमच्या वॉर्डमध्ये होणार आहे? याबाबतची माहिती नगरसेवकांना मिळाली पाहिजे. कारण ते अचानकपणे सांगतात आणि कोठेही कसेही खोदकाम करतात. सी.सी.टी.व्ही.सुध्दा कुठेही आणि कसेही लावले आहेत.

मा.अविनाश बागवे–आपण, मनपाने या कामांचे पैसे दिले आहेत.

मा.अध्यक्षा–सी.सी.टी.व्ही.बसविणे या कामासाठी जे खोदकाम करावयाचे आहे आणि या संदर्भात महानगरपालिकेला माहिती असेल तर स्थानिक नगरसेवकांना ही माहिती तातडीने देणे हे अत्यावश्यक आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–मा.बकोरिया साहेब, मी स्वत: याबाबत आपल्या अधिकाऱ्यांकडे विचारणा केली होती परंतु त्यांना देखील याबाबत कोणतीही माहिती नव्हती. आपण त्यांना जागा सजेस्ट करू शकतो.

मा.अध्यक्षा–यामध्ये को–ऑर्डिनेशन आवश्यक आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते लाईन कशी टाकणार आहेत? त्याचे डायग्राम्स मिळाले पाहिजेत.

मा.अध्यक्षा–पुणे शहरामध्ये राज्य शासनाकडून जे सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात येत आहेत, त्या संदर्भात महानगरपालिका प्रशासनाला व स्थानिक नगरसेवकांना कळविण्यात यावे, यासाठी प्रशासनाने पोलीस खात्याबरोबर पत्रव्यवहार करावा.

श्री.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)–मा.अध्यक्षा महोदया, शहरामध्ये सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविणे या कामाच्या पहिल्या टप्यातील काम पूर्ण झालेले आहे. त्यावेळी जाईन्ट इन्सपेक्शन करूनच त्यांना परवानगी देण्यात आली होती.

मा.अध्यक्षा–मा.सभासद यांचे म्हणणे असे आहे की, याबाबत आम्हाला कोणतीही माहिती देण्यात आली नाही.

श्री.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)– यापुढे आम्ही खबरदारी घेऊ.

मा.सौ.मुक्ता टिळक–संबंधीत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना याबाबत माहिती मिळाल्यास ते योग्य होईल.

श्री.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)–ठीक आहे.

विषय क्र.१४६२
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१४६३
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.
विषय क्र.१४६४
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.
विषय क्र.१४६५
मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण हा विषय पुढे घेतला आहे, परंतु या विषयाबद्दल कोर्टातील सद्यस्थितीची माहिती द्यावी.
श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.व प्रकल्प)–या केसबाबत दि.२८ आणि दि.३० रोजी हिंअरींग झाले होते आणि ३० तारखेच्या हिंअरींग मध्ये दि.२४/११ अशी तारीख दिलेली आहे. या केसमध्ये ज्या ज्यावेळी तारखा पडल्या आहेत त्याबाबतची प्रिंट सोबत आणली आहे. त्यांनी प्रत्येकवेळेला नवीन नवीन इश्यू उपस्थित केले आहेत. आता टी.डी.आर.चा इश्यू उपस्थित केला आहे. ते डॉक्युमेंटस सबमिट करीत नाहीत आणि आम्हाला टी.डी.आर.पाहिजे असे म्हणत आहेत. त्यांनी सुरूवातीला असा आक्षेप घेतला होता की, आम्हाला अलंकार सिनेमाच्या बाजूने अॅप्रोच रस्ता द्यावा. परंतु त्यामध्ये आपण त्यांना ३ मीटरचा अॅप्रोच रस्ता देऊन, आपण आपल्या पुलाचे काम करू शकता, असा एम.ओ.यु.आपण तयार केला होता आणि ते कोर्टाकडे सादर केले होते. पहिल्यांदा कोर्टाच्या तारखा आणि त्यानंतर त्यांचे वकील उपस्थित नाहीत, त्यानंतर त्यांचे ओनर उपस्थित नाहीत. त्यानंतर त्यांनी आपल्या सबमिशनमध्ये नवीन नवीन मुद्दे उपस्थित करून पुढील तारखा घेतल्या आता मा.न्यायाधीश महोदयांनी दि.२४/११ ची वेळ दिली आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा महोदय, शहराच्या दृष्टीने हा प्रोजेक्ट महत्वाचा आहे आणि त्यासाठी बजेट मध्ये या सगळया रक्कमांची तरतूद केली आहे, कामाची तातडी आहे, असे मुद्दे आपण रेस केले पाहिजेत.
श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.व प्रकल्प)–सर, आम्ही याबाबत मा.न्यायाधीशांना समक्ष भेटून, हे काम किती महत्वाचे आहे? आणि यासाठी रेल्वे खात्याने मान्यता दिलेली आहे, जहॉगिर हॉस्पीटलच्या बाजूने काम पूर्ण झालेले आहे आणि अलंकार सिनेमा गृहाच्या बाजूचे काम शिल्लक राहिले आहे. या सगळया बाबी आम्ही त्यांच्या निदर्शनास आणल्या आहेत. यामध्ये जे ओनर आहेत ते पहिल्यांदा टी.डी.आर.च्या संदर्भात कोर्टात गेले आणि कोर्टाने असा निकाल दिला की, संबंधीतांना डॉक्युमेंट सादर केल्यानंतर १५ दिवसात टी.डी.आर.द्यावा. आम्ही ही अट सुध्दा मान्य केली आहे आणि आता त्यांची अशी मागणी आहे की, आम्हाला परमिशनच्या सोबत टी.डी.आर.सुध्दा हवा आहे. परंतु ते आपल्याकडे कोणतेही डॉक्युमेंटस सबमिट करीत नाहीत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामुळे मा.सभासदांमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत. त्यामुळे मा.मुख्यसभेमध्ये आमचे सर्व विषय थांबले आहेत. हे प्रॅक्टीकल आहे.
मा.अविनाश बागवे–मी विनंती करीत आहे की, आपण पुढील सभेमध्ये श्री.बोनाला साहेबांचा एक चांगला सत्कार करू. कारण आम्ही त्यांना पूर्वीपासून तेच सांगत आहे की, ते लोक ऐकणार नाहीत. परंतु यांचे म्हणणे असे आहे की, नाही यावेळी ते लोक केस मागे घेणार आहेत आणि या तारखेमध्ये निकाल लागणार आहे. यामध्ये तुम्ही काही करू नका, असे त्यांनी सांगितले होते. यामध्ये कोर्टकेस आहे, या कामाला वेळ लागणार आहे, असे आम्ही त्यांना सांगितले होते. मा.सभासद सुध्दा या केसचा फालोअप करीत आहेत. स्थानिक सभासद सुध्दा फालोअप करीत आहेत म्हणून त्यांनी हा प्रस्ताव दिला आहे. परंतु मागील वेळेस यांनी निष्कारण ते स्टेंटमेंट केले आणि मग तो प्रस्ताव पुढे गेला. त्यानंतर मा.मुख्यसभेमध्ये काय झाले? ते आपण सर्वांना माहिती आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामुळे मा.सभासदामध्ये भांडणे लावण्याचे काम झाले.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–होय
मा.अविनाश बागवे–ते सुध्दा काहीही कारण नसताना असे झाले आहे. आम्ही विनंती सुध्दा केली होती की, हा विषय मान्य करावा आणि जर केसचा निकाल लागला तर, शेवटी या विषयाबाबतची मा.मुख्यसभा पुढील महिन्यामध्ये जाणार आहे आणि आपल्याकडे एक महिन्याचा कालावधी शिल्लक असेल, त्या दरम्यान आपण फेरविचार देऊन करू, परंतु नाही म्हणून हा विषय पुढील सभेसाठी घेण्यात आला.
मा.अध्यक्षा–तसाही तो विषय वन–के अन्वये त्याच महिन्याच्या जी.बी.मध्ये जाणार होता.
मा.अविनाश बागवे–नाही, त्यावेळी असे सांगितले होते की, हा विषय पुढील महिन्याच्या मा.मुख्यसभेमध्ये जाईल. आता आपल्याकडे एक महिन्याचा कालावधी आहे आणि या आठवड्यामध्ये त्या केसचा काही वेगळा निकाल लागला तर आपण आपल्या ठरावाचा फेरविचार देऊ, असे देखील सांगितले होते.
श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.व प्रकल्प)–मा.चेअरमन मॅडम, मी आपल्याला पहिल्यांदा १४ नोव्हेंबर असे सांगितले होते नंतर मला माहिती मिळाल्यानंतर मी आपल्याला रिक्वेस्ट केली होती की, हे दि.१४ नोव्हेंबर नाही ते दि.२८ ऑक्टोंबर असे होते आणि माझी रिक्वेस्ट मान्य करून, पुढच्या मंगळवारी म्हणजे नेक्स्ट मिटींगमध्ये सुध्दा आपण विषय घेतला होता.
मा.अविनाश बागवे–श्री.बोनाला साहेब,आपण तारखांची माहिती आणली आहे. यामध्ये किती तारखा झाल्या आहेत? याबाबतची ॲप्रोझिमेटली माहिती द्यावी.
श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.व प्रकल्प)–यामध्ये २६ तारखा पडल्या आहेत.

मा.अविनाश बागवे–यामध्ये एवढे सगळे असताना तुम्ही उगाचच का, सभागृहाची दिशाभूल करीत आहात?

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.व प्रकल्प)–हा मागील दोन वर्षातील प्रोग्रॅम आहे पण आता आपण एम.ओ.यु.तयार केल्यानंतर..

मा.अविनाश बागवे–तुम्ही एम.ओ.यु.तयार केल्यानंतरही ती विक्षिप्त व्यक्ती तुमचा काही ना काही मुद्दा काढून तुमचा डिले करीत आहे आणि एवढे सगळे असताना देखील तुम्ही सभासदाचा निधी का लॅप्स करीत आहात?

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.व प्रकल्प)–सर, मागच्या मंगळवारचे आणि या मंगळवारचे..

मा.अविनाश बागवे–पुढील वेळेस तुम्ही सभागृहामध्ये कोणती तारीख आहे? फक्त याचीच माहिती द्यावी. कोर्टामध्ये निकाल काय लागणार आहे? याची भविष्यवाणी करू नये. तुमच्या एका चुकीमुळे किती मोठे रामायण झाले. ते तुम्हाला माहिती नाही.

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाह.व प्रकल्प)–मा.चेअरमन मॅडम, मागील वेळेस कोर्ट आपल्या बाजूने निकाल देणार आहे, असे मी सांगितलेले नाही. मागील वेळेस २८ तारीख..

मा.अविनाश बागवे–त्यांना रेकॉर्डिंग दाखविण्याची व्यवस्था व्हावी. मा.नगरसचिव साहेब, आपण मागील सभेची एक सी.डी.श्री.बोनाला साहेब यांच्याकडे पाठवावी. ते काय बोलले होते ते त्यांना सुध्दा ऐकू द्यावे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आम्ही प्रशासनाच्या शब्दावर भरवसा ठेवून आम्ही तो विषय पुढे केला परंतु तो विषय कमिटीच्या अंगावर आला. हे आपण लक्षात ठेवावे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय पुढील सभेत घ्यावा. कारण पुढील आठवड्यामध्ये आमची मिटींग आहे

**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.

विषय क्र.१४६६

मा.अध्यक्षा–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.

विषय क्र.१४६७

मा.नगरसचिव–या विषयामध्ये, विषयपत्र मागे घेत असल्याचे, खात्याने पत्र दिले आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–आपण हे विषयपत्र मागे का घेत आहात?

श्री.डॉ.परदेशी,आरोग्यप्रमुख–मा.अध्यक्षा, मागील सभेमध्ये याप्रकरणी मा.सभासदानी आक्षेप घेतले होते आणि त्यामुळे मा.महापालिका आयुक्त साहेबांनी या टेंडरबाबत चौकशी करण्याचे आदेश दिले होते त्याप्रमाणे आपण हे दक्षता विभागाला पाठविले आहे.

मा.अविनाश बागवे–तुम्ही झालेले टेंडरींग दक्षता विभागाकडे पाठविणार आहात परंतु हे ऑलरेडी दक्षता विभागाकडूनच येते.

श्री.डॉ.परदेशी,आरोग्यप्रमुख–नाही, सर तशी गरज नसते. ती मोजक्या केसेमध्येच दक्षता विभागाची आवश्यकता असते. हे खरेदीबाबतचे आहे.

**निर्णय–**सदर विषयाबाबत, विषयपत्र मागे घेण्यात आले.

मा.अध्यक्षा–तुम्ही आता विषयपत्र मागे घेतले आहे मग तुमच्या विभागाला याची आवश्यकता नाही का?

श्री.डॉ.परदेशी,आरोग्यप्रमुख–मा.अध्यक्षा, आम्हाला याची गरज आहे.

मा.अध्यक्षा–गरज असल्यांस आपण यासाठी काय करणार आहात?

मा.सौ.मुक्ता टिळक–रिटेंडर.

श्री.डॉ.परदेशी,आरोग्यप्रमुख–मॅडम, अद्याप दक्षता विभागाचा रिपोर्ट आलेला नाही.

मा.डॉ.उदय टेकाळे,उपायुक्त(दक्षता)–मा.अध्यक्षा, आमच्याकडे ही फाईल काल आली आहे.

मा.अध्यक्षा–हा आरोग्य विभागाचा विषय आहे आणि यामुळे पुन्हा काही अडचणी निर्माण व्हायला नको. तुम्ही हा विषय पुन्हा पुढील आठवड्यामध्ये आणणार आहात का?

मा.अविनाश बागवे–यामध्ये जर काही त्रुटी आहेत किंवा नाहीत याबाबतची पाहणी करून ते मा.स्थायी समितीच्या पुढील सभेत सादर करावे.

विषय क्र.१४६८

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय–**सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.

विषय क्र.१४६९

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

मा.अविनाश बागवे–या विषयाबाबत त्या गावांमधील विकास कामांची माहिती मिळणार होती परंतु ती अद्याप मिळालेली नाही.

श्रीमती किशोरी गद्रे, उप आयुक्त(घ.क.व्यव.)–याबाबतची माहिती मी उपलब्ध करून देते.

**निर्णय–** सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.

मा.अविनाश बागवे–मा.अति.आयुक्त,साहेब मागील मा.स्थायी समितीच्या आम्ही सभेमध्ये आरोग्य खात्याकडे बोगस डॉक्टर्संच्या डिग्री संदर्भात माहिती विचारली होती आणि अभियंता सवंर्गाबाबत सुध्दा विचारणा केली होती परंतु त्यावेळी सेवकवर्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी आम्ही हे तपासून माहिती देऊ, असे सांगितले होते. परंतु त्यांनी काहीही सांगितले नाही आणि काल परवाच्या वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आली आहे की, आपण आपल्याकडे पदनियुक्ती मध्ये आपण शिपाई आणि गंवडी सेवकांना

पदनियुक्ती केली आहे. आपण त्यांना कनिष्ठ अभियंता बनविले आहे. आपण यामध्ये कोणती तपासणी केली ? याबाबत माहिती द्यावी.

श्री.मंगेश जोशी,उपायुक्त(सेवकवर्ग वि.)–मा.अध्यक्षा महोदया, डॉक्टरांच्या बाबतीत आपण मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया यांना कळविले होते आणि आपल्याला त्यांचे पत्र आले आहे. त्यामध्ये त्यांच्या ज्या ई.पी.एच.च्या डिग्रीज आहेत त्याचे रजिस्ट्रेशन आम्ही दिले आहे, असे कळविले आहे.

मा.अविनाश बागवे–आपण दोन्ही गोष्टी कळविणार होतो. यामध्ये एक खात्याकडून माहिती घेऊन आणि आता आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचत आहोत की, रात्रीच्या वेळ मेल्स चालू आहेत. आम्ही त्यांच्या डिग्री संदर्भात पूर्वीच विचारले होते. त्याबाबत आम्हाला काही सांगितले नाही.

श्री.मंगेश जोशी,उपायुक्त(सेवकवर्ग वि.)–आपण त्यासाठी मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र मेडीकल असोशिऐशन या दोन्हींकडे मार्गदर्शन मागितले होते आणि त्याबाबत या दोन्ही संस्थांकडून, त्याची जी, डी.पी.एस.ची जी डिग्री आहे त्याला आम्ही रजिस्ट्रेशन दिले असल्याचे कळविले आहे आणि ही त्या पत्राची कॉपी आहे.

मा.अविनाश बागवे–यामध्ये कोणाकडे कोणत्या डिग्रीज आहेत? तुम्ही याबाबत कोणती मागणी केली? व त्या संस्थांनी काय सांगितले? याबाबतची पूर्ण माहिती आम्हाला द्यावी. तसेच आपण अभियंता वर्गाबाबत कोणती तपासणी केली यांची माहिती द्यावी.

श्री.मंगेश जोशी,उपायुक्त(सेवकवर्ग वि.)–अभियंता संवर्गाबाबत आम्ही युनिर्व्हसिटी ग्रण्ड कमिशन (यु.जी.सी.) कडे मार्गदर्शन मागितले होते. त्यांनी आपल्याला डिग्रीबाबत काहीच सांगितले नाही. फक्त हे कॉलेजेस युनिर्व्हसिटी रजिस्टर्ड आहेत, एवढे मात्र सांगितले आहे. आपण त्यांच्या डिग्रीज तपासण्यासाठी पाठविल्या होत्या परंतु त्याबाबतीत त्यांनी काहीही सांगितले नाही.

मा.अविनाश बागवे–मा.अति.आयुक्त, बकोरिया साहेब आम्ही मागील वेळेसच बोललो होतो की, आपण दक्षता घ्यावी कारण खात्यामध्ये उभी फळी निर्माण होत आहे परंतु ज्यावेळी वर्तमानपत्रामध्ये बातमी आली त्यानंतर तुम्हाला बैठक घ्यावी लागली. हे आधीच केले असते तर वर्तमानपत्रातून बातम्या आल्या नसत्या आणि आपल्या महानगरपालिकेची प्रतिमा मलीन झाली नसती. दुसरा मुद्दा असा आहे की, आता आपण अभियंता संवर्गाबद्दल माहिती दिली आणि यु.जी.सी. ने मा.जगताप,अति.महा.आयुक्त (इ) यांना पाठविलेले पत्र माझ्याकडे आहे. त्यामध्ये त्यांनी सरळ लिहले आहे की, मेन कोर्सेसला त्या युनिर्व्हसिटीजला मान्यता आहे. परंतु आपल्या ज्या सेवकांना तुम्ही पदोन्नती दिली. ती सुध्दा कशी दिली? हा सुध्दा एक मोठा प्रश्न आहे. पदोन्नती मध्ये जर एखादी व्यक्ती क्लेअरीकल पोस्टवर काम करीत आहे, तो ड्राफ्समन असेल आणि त्याने डिप्लोमा केला असेल तर समजू शकतो. परंतु तुम्ही शिपाई आणि गंवड्याची पदोन्नती इंजिनिअर म्हणून केली आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–असे जर झाले असेल तर ते हॉरिबल आहे.

मा.अविनाश बागवे–होय, अशी १० ते १२ नावे आहेत आणि यामध्ये ८ ते ९ सेवकांनी शिपाई म्हणून काम केले होते आणि आता त्यांची तुम्ही जे.ई.म्हणून पदोन्नती केली आहे आणि त्या सेवकांच्या डिग्रीज आसाम व राजस्थान येथील आहे. यामध्ये शासनाने असे केले आहे की, जर एखादी टेक्नीकल डिग्री असेल तर त्यासाठी तुम्हाला पहिल्यांदा अे.आय.सी.टी.(ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्नीकल एजुकेशन) ची मान्यता घ्यावी लागते. त्यांची मान्यता घेऊन ते विद्यापीठ मान्यता प्राप्त असेल तरच तुम्हाला अशा सरकारी क्षेत्रामध्ये तुम्हाला ते देता येते. परंतु यांनी काही पाहिले नाही.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामध्ये मला एक शंका आली की, हा जर नियम असेल आणि मध्यतंरी वर्तमानपत्रातून बातमी पाहिली होती, टी.व्ही.वर सुध्दा ऐकले होते की, ज्ञानेश्वर विद्यापीठाची कोणीतरी काहीतरी..

मा.अविनाश बागवे–मा.सभागृहनेते, त्याचा इथे काही संबंध नाही

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–मला शंका आली म्हणून मी विचारणा करीत आहे. मा.कर्णे गुरूजी माझे काही चुकत आहे का? आपले कोणीतरी मंत्री आहेत.

मा.अविनाश बागवे–ती नियुक्ती आहे, निवड नाही. इथे निवड प्रक्रिया आहे. मा.सभागृहनेते, हा अतिशय गंभीर विषय आहे कारण आता हे जे जे.ई.आहेत ते २ ते ३ वर्षे कोणत्या तरी विभागात काम करतील आणि त्यांची उद्या जर बांधकाम खात्यामध्ये नियुक्त्या केल्या, पथ विभागामध्ये नियुक्त्या केल्या. उद्या जर का याच जे.ई.ने जर मेट्रोचे काम चालू केले आणि त्यातून दुर्घटना होणार नाही, हे कशावरून? तुम्ही शिपायाला जे.ई.करीत आहात ते सुध्दा काहीही न पाहता. तुमच्याकडे अे.आय.सी.टी.ची मान्यता नाही. तुम्ही जे यु.जी.सी.कडून माहिती घेतली की, आसामची युनिर्व्हसिटी आहे आणि त्या युनिर्व्हसिटीची सर्व माहिती इंटरनेटवर आहे. त्यांच्या कोर्सेसची माहिती इंटरनेट आहे. मी ही माहिती नेटवरूनच काढली आहे. यामध्ये डिप्लोमा सिव्हील नाही. यामध्ये इन्व्हॉयरमेटल, इन्फॉरमेशन सायन्स ॲण्ड टेक्नालॉजीचे आहे आणि आपण त्यांना बी.ई.सिव्हीलचे दिले आहे. यामध्ये संबंध काय आहे? राजस्थान मधील कॉलेजेस, ही सर्व माहिती दिली आहे. यामध्ये दि.९ मे २०१४ रोजीचा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे की, Prier approval of compulsory & mandatory to conduct technical courses. त्यांनी तेथील स्टडी सेंटरचे सर्टिफिकेट आणले आहे आणि तुम्ही त्याची काहीही तपासणी न करता ते दिले आहे. यावर चौकशा झाल्या आहेत आणि पत्रकार सुध्दा विचारणा करीत आहेत. यामध्ये दुसरे जे अभियंते कष्ट करून, अभ्यास करून परिक्षा पास होतात त्यांची तुम्ही इंजिनिअर म्हणून भरती करीत नाही. तुम्ही त्यांच्या रिक्रूपमेंट रखडवित आहात. सध्या आपण जर बांधकाम विभागात गेलो तर आपल्याला असे सांगण्यात येते की, आमच्या इंजिनिअर्स नाहीत, पथ विभागाकडे याबाबत विचारणा केली असता ते सुध्दा असेच सांगतात की , आमच्याकडे इंजिनिअर्स नाहीत तसेच आपण इतर खाते किंवा वॉर्ड ऑफिसेसकडे सुध्दा विचारणा केली तर, आमच्याकडे इंजिनिअर्स नाहीत, असे सांगण्यात येते. मग तुम्ही भरतीप्रक्रिया करीत नाही आणि अशा शिपाई व गवंडी यांना बॅकडोअर इंट्रीज करीत आहात. हे कितपत जस्टीफाईड आहे?

श्री.मंगेश जोशी,उपायुक्त(सेवकवर्ग वि.)–मा.अध्यक्ष महोदया, शिपाई आणि गंवडी चा उल्लेख आला आहे तो आपल्या रिक्रूपमेंट रूल्स मध्ये, इंजिनिअरींगच्या ज्या २५ टक्के आहेत त्या बढतीने भरता येतात, अशी तरतूद आहे.

मा.अविनाश बागवे–हो, पण कोणत्या पोस्टवर?

श्री.मंगेश जोशी,उपायुक्त(सेवकवर्ग वि.)–बढतीने भरता येतात आणि ज्यामध्ये महानगरपालिकेच्या सेवकाकडे अशाप्रकारची डिग्री, डिप्लोमा आहे. त्यांचा विचार करता येतो. यामध्ये असे कुठेही असे म्हंटले नाही की, वर्ग ४ चा विचार करू नये. त्यामुळे आपण परिपत्रक काढले होते आणि त्यानंतर आपल्याकडे २० ते २५ लोकांना ॲप्लीकेशन केले होते.

मा.अध्यक्षा– वर्ग ४ चा विचार करू नये, असे नमूद केले नाही हे आम्हाला मान्य आहे परंतु या महत्वाच्या डिग्रीज आवश्यक आहेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–क्वॉलिफीकेशन मेंटेन करणे, ते पहाणे, हे आपले काम नाही का?

(सभागृहात गोंधळ सुरू होता)

मा.अविनाश बागवे–एखादा सेवक पदवीधर आहे आणि तो शिपाई म्हणून काम करीत आहे आणि अशा लोकांनी शिक्षण घेऊन इंजिनिअरींग पूर्ण केले असेल तर अशा सेवकांना आवश्य घ्यावे. आपण त्या सेवकांचा सत्कार केला पाहिजे. परंतु जे शिपाई, गंवडी इ.८वी पास होते आणि त्यांनी आता बोगस डिग्रीज आणल्या आहेत आणि तुम्ही त्यांची पदोन्नती करीत आहात. साहेब, तुम्हाला पदोन्नती देण्यासाठी रूल्स आहेत. तुमच्या त्या लॅडरप्रमाणे समजा क्लेरीकल मध्ये असेल तर त्या पुढील. परंतु यामध्ये डायरेक्ट जंम्पीग करून ३ ते ४ ग्रेडच्या वरील पदोन्नती करीत आहात.

श्री.मंगेश जोशी,उपायुक्त(सेवकवर्ग वि.)–मा.अध्यक्षा महोदया, यामध्ये असे म्हंटलेले नाही. रिक्रूटमेंट रोल मध्ये अशा जागापैकी २५ टक्के फक्त सेवकांमधून भरण्यात याव्यात, असे म्हंटले आहे.

मा.अविनाश बागवे–तुम्ही आता जे सांगत आहात आणि पुढील सभेमध्ये आपण आपल्याकडील रोस्टर वाचून दाखवावे. त्यामध्ये असे लिहले आहे की, पदोन्नती देताना त्यामध्ये सेवाजेष्ठता आणि कोणती ग्रेड असावी? हे सर्व त्यांनी त्यामध्ये दिले आहे. साहेब, सगळे क्लेअर असताना तुम्ही हे करीत आहात. मा.अति.महा.आयुक्त, बकोरिया साहेब आमची आपल्याकडे विनंती आहे की, या सगळया गोष्टींची सखोल चौकशी करावी आणि यामध्ये जे बोगस डिग्रीवाले आहेत. डिस्टन्स लर्निंगने टेक्नीकल कोर्सेस होतात का? ते करूच शकत नाहीत. ते ज्या विद्यापीठाचे सांगत आहेत आणि यामध्ये यु.जी.सी.मान्यता दिलेल्या कॉलेजेसकडे तो कोर्सच नाही. तरी तुम्ही मान्यता देत आहात? ते कॉलेजेस महाराष्ट्राच्या बाहेरचे आहेत. ते आसामचे आहेत, ते राजस्थानचे आहेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यांच्याकडे तो कोर्स असणे आवश्यक आहे.

मा.अविनाश बागवे–आपल्या राज्यातील जे डायरेक्टर ऑफ टेक्नीकल एज्युकेशनचे कार्यालय आपल्या पुणे शहरात आहे. एस.एन.डी.टी.जवळ हे कार्यालय आहे आणि तिथे डेप्युटी डायरेक्टर बसतात. निदान त्यांच्याकडून तरी ही चौकशी करून घ्यावयास हवी होती. यामध्ये जे कोर्सेस आहेत ते मान्यता प्राप्त आहेत का? यांना आम्ही अशा पध्दतीने पदोन्नती देऊ का? एवढी तरी विचारपूस करावयास हवी होती.

मा.अध्यक्षा–हे त्यांच्याकडून आता सुध्दा तपासणी करून घ्यावे.

मा.अविनाश बागवे–ते करून घेऊ शकतात. मा.बकोरिया, अति.महा.आयुक्त साहेब, आपण त्यांची ताबडतोब तपासणी करावी आणि या तपासणी मध्ये ते जर दोषी आढळले. त्यांना तर ठीक आहे की, त्यांच्यावर जी कारवाई होईल. परंतु त्यांच्या ऑर्डर्स ज्यांनी काढल्या आहेत त्या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा असे कोणीही काहीही करेल.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–सिलेक्शन करणाऱ्यांना हे सांगितले आहे का?

मा.अविनाश बागवे–आम्ही याबाबत मे महिन्यामध्येच विचारणा केली होती परंतु आम्ही हे यु.जी.सी.कडे पाठविले आहे ते येणार आहे आणि आता यु.जी.सी.चे पत्र येऊनही दोन महिने झाले आहेत. परंतु यामध्ये खात्याने व प्रशासनाने काहीच कारवाई केली नाही. हे पत्र सप्टेंबर महिन्यामध्ये आले आहे आणि मग यामध्ये आपण काहीच का करीत नाही? याची दखल घेतली नाही, याबाबत चौकशी सुध्दा केली नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये असे किती लोक आहेत?

मा.अविनाश बागवे–यामध्ये एकूण २३ लोक आहेत आणि त्यापैकी १२ लोक अशा प्रकारचे आहेत. बाकीचे लोक सगळया नॉर्म्समध्ये बसतात. परंतु यामध्ये उर्वरित असे १२ लोक आहेत. मा.अति.आयुक्त साहेब, आपण टेक्नीकल आणि मेडीकल या दोन क्षेत्रामध्ये कोठेही कॉम्परमाईज करू नये. कारण हा मुद्दा लोकांच्या जीवाशी संबंधीत आहे. एखाद्या लेखनिकाने जर एखादी फाईल उशीराने पाठविली, त्याला गांर्भीय कळाले नाही तरी त्याच्यावर अधिकारी असतात परंतु उद्या हे जे.ई.पूल बांधणार आहेत.

मा.सौ.मुक्ता टिळक–मा.सभागृहनेते, शिक्षकांच्या बाबतीत सुध्दा असे होऊ नये.

मा.अध्यक्षा–शिक्षणमंडळाकडून शिपाई सेवकांच्याबाबतचे विषयपत्र सादर होणार होते, परंतु ते अद्याप आले नाही. याबाबतची माहिती द्यावी.

मा.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, शिपाई आणि रखवालदार सेवकांच्याबाबतचे प्रकरण अगोदर शासनाकडे गेलेले आहे.

मा.अध्यक्षा–मागील सभेमध्ये मा.सभासदानी उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार, आपण काही पेमेंटस थांबविले आहेत. त्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–आम्ही तो विषय आज मा.महा.आयुक्त साहेब यांच्याकडे सादर केला आहे.

मा.अध्यक्षा–शेवटी शिक्षण मंडळाच्या बजेटमध्ये तरतूद आहे आणि ऑलरेडी ते पेमेंट महानगरपालिकाच करते. मग हे थांबविण्याची गरज काय आहे? माहिती घेण्यासाठी बोलाविले तरी आपण माहितीच देत नाही आणि आम्हाला नंतर ही माहिती बाहेरून समजते. तुम्ही चुकीची माहिती ठेवू नका.

मा.अविनाश बागवे–जोपर्यंत गवंडी आणि शिपाई यांच्या पदोन्नतीच्या चौकशीचे कामकाज पूर्ण होत नाही तोपर्यंत त्यांना जे.ई.चे कामकाज देण्यात येऊ नये. आपण यामध्ये ऑर्डर काढली असेल परंतु त्यांना ती कामे देण्यात येऊ नयेत. त्यांना काहीतरी कार्यालयीन कामकाज द्यावे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–प्रशासनाने या गवंडी आणि शिपाई पदोन्नती प्रकरणांतील आडनावे वाचून दाखववावीत.

मा.अविनाश बागवे–यामध्ये १२ नावे आहेत आणि त्यातील आढारी रामदास तुळशीराम हे गवंडी होते त्यांना जे.ई केले आहे त्यांच्याकडे आसाम युनिर्व्हसिटीची पदवी आहे. तसेच यामध्ये जे दुसरे सेवक आहे ते गीते राजेश आणि ते शिपाई पदावर होते. असे एकूण १२ जण आहेत आणि फक्त चर्चा करण्यासाठी म्हणून ही दोन नावे सांगितली आहेत.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–आपल्याकडे ती नावे आहेत का? असतील तर द्यावीत कारण यामध्ये कोणती आडनावे आहेत ते पाहून, ते कोणत्या समाजाचे आहेत ते पाहून आम्हाला त्याबाबत पाठिंबा जाहिर करावा लागेल.

मा.अविनाश बागवे–म्हणजे?

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–ते जर का बहुजन समाजाचे लोक असतील आणि ते प्रयत्न करून पुढे जात असतील तर..

मा.अविनाश बागवे–यामध्ये समाजाचा संबंध काय आहे?

(सभागृहात गोंधळ होता)

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामध्ये जर अशी कोणी व्यक्ती असेल आणि ती स्वत:च्या कतृत्वावर शिकत असेल तर आम्ही त्याच्या पाठीशी आहोत.

मा.अविनाश बागवे–त्याबद्दल आमचे दुमत नाही. आमचा विषय बोगस डिग्रीचा विषय आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय बोगस डिग्रीबाबत आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–आम्ही फक्त असे विचारत आहोत की, त्याने अभ्यास केला आहे का?

मा.अविनाश बागवे–मा.सभागृहनेते, आपल्या प्रशासनाने तेच तपासून पहावे याबाबत सांगत आहोत. मा.बकोरिया साहेब, यावर प्रशासन काय करणार आहे? आणि तोपर्यंत त्यांना कोणतेही तांत्रिक काम देऊ नये उद्या एखादा लॉस झाला तर अडचण होऊ नये. त्यांना फक्त रूटीनची कामे द्यावीत.

मा.राहूल तुपेरे–मा.अध्यक्षा, आमच्या जनता वसाहत येथील मनपा शाळेमध्ये आणि सगळीकडे देखील जवळजवळ सहामाही परिक्षा संपत आल्या आहेत. तरी देखील आमच्या शाळेसाठी शिक्षक मिळालेले नाहीत. मी याबाबत वारंवार मागणी करीत आहे आणि ते फक्त, शिक्षक मिळतील असे सांगत आहेत परंतु ते शिक्षक उपलब्ध करून कधी देणार आहेत?

मा.अनिल राणे–शिक्षण मंडळाकडून अहवाल सुध्दा देण्यात येणार होता तो सुध्दा देण्यात आलेला नाही.

मा.राहूल तुपेरे–शिक्षण मंडळाकडून शिक्षक देण्यात येत नाहीत, अहवाल देण्यात येत नाहीत याचा अर्थ असा होतो की, त्यांनी हे जाणूनबुजून केलेले आहे.

मा.अनिल राणे–त्यांनी मागील सभेत ८ दिवसांमध्ये हा अहवाल देतो असे सांगितले होते.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, आम्ही हा अहवाल आणला आहे आणि मागील सभेत सुध्दा आणलेला होता आणि शिक्षकांच्या बाबतीत, शाळा विलिनीकरण म्हणजे जिथे विद्यार्थ्यी कमी आहेत तिथून जास्त विद्यार्थ्यी असलेल्या ठिकाणी पाठविणेबाबतची फाईल अद्याप मा.महा.आयुक्त यांच्या कार्यालयाकडे प्रलंबित आहे. ती फाईल आल्यानंतर शिक्षक उपलब्ध होऊ शकतील.

मा.राहूल तुपेरे–परंतु आमच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यी संख्या जास्त आहे.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मला ते मान्य आहे परंतु मान्यता..

मा.राहूल तुपेरे–आपण आमच्या शाळेमध्ये व्हिजीट केली आहे का?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–होय, आपल्या सोबतच दोनदा पाहणी केली आहे.

मा.राहूल तुपेरे–मग त्यावर आपण काय केले?

मा.अनिल राणे–त्यांच्या शाळेमध्ये जर विद्यार्थी जास्त असतील तर मग विलीनीकरणाचा विषय येतोच कुठे?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–दुसऱ्या शाळेमध्ये जास्त असलेले शिक्षक या शाळेमध्ये पाठविणेसाठी ते आवश्यक आहे.

मा.अनिल राणे–तुम्ही शाळावाईज शिक्षकांच्या माहितीचा अहवाल देणार होते.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–तो अहवाल, मी सोबत आणलेला आहे.

मा.अनिल राणे– आपण ती प्रत मा.स्थायी समितीला देणार होते.

मा.राहूल तुपेरे–मा.अध्यक्षा, आमच्या प्रभागामध्ये झोपडपट्टी असून झोपडपट्टीतील मुलांचे शिक्षण बंद करण्याचा प्रयत्न जाणूनबुजून केला जात आहे. तुम्ही शिक्षणप्रमुखांवर कोणती कारवाई करणार आहात?

मा.अनिल राणे–मा.अध्यक्षा, हा अहवाल द्यावा म्हणून आपण मागील सभेमध्ये आदेश दिले होते.

मा.अध्यक्षा–आता मा.सभासद जी तक्रार करीत आहेत. ती गंभीर आहे आणि आता सहामाही परिक्षा संपत आली तरीसुध्दा शिक्षक का पाठविले नाहीत? आम्ही आता आपणास कोणत्या प्रकारची शिक्षा करावी?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, ज्या शाळेमध्ये शिक्षक जास्त आहेत आणि विद्यार्थ्यी संख्या कमी आहे अशा ठिकाणी शाळा विलिनीकरणाची प्रोसेस असते ती प्रलंबित आहे. ते मान्य झाल्यानंतर आपल्याला जेथे शिक्षक कमी आहेत तिथे ते उपलब्ध करून देता येतील.

मा.राहूल तुपेरे–आता वार्षिक परिक्षा संपल्यानंतर व उन्हाळयाच्या सुट्टीमध्ये शिक्षक उपब्लध करून देणार आहात का?

मा.अनिल राणे–मा.अध्यक्षा, आपण जर पाहणी केली तर असे आढळून येईल की, अनेक शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक आहेत म्हणून आपण तो अहवाल मागितला आहे परंतु तो अहवाल आपल्याकडे दिलेला नाही.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.शिक्षणप्रमुख, आपणास समायोजन करण्याचे पूर्ण अधिकार आहे आणि तुम्ही समक्ष व्हिजीट केली तर असे दिसून येईल की, विद्यार्थ्यी संख्या मोठी आहे आणि वर्ग मोठे असल्याने जोडवर्ग घ्यावे लागत आहेत. त्यामुळे आपण याबाबतच्या ऑर्डस काढल्या पाहिजे.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, यासाठी मा.महा.आयुक्त साहेबांची परवानगी घ्यावी लागते. मला हे परस्पर करता येत नाही. या बदल्याबाबतीत.

(सभागृहात गोंधळ सुरू झाला)

मा.बापूराव कर्णे गुरूजी–या बदल्या नाहीत.

मा.अनिल राणे–सतत बदल्यांची चर्चा का चालू आहे? शाळेतील मुलांना शिक्षण द्यावे की नाही? दोन दोन महिन्यांमध्ये शिक्षकांची बदली होत आहे.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, मागील पटाप्रमाणे जिथे विद्यार्थ्यी कमी झाले आहेत जिथे शिक्षक जास्त आहेत त्यांच्या समायोजनासाठी, मा.महा.आयुक्त साहेबांकडून मान्य करून घ्यावे लागते आणि मग पाठवावे लागते.

मा.राहूल तुपेरे–यामुळे आमच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, त्याचे काय करणार आहात?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–शिक्षणप्रमुखांचे अधिकार कमी केले आहेत का?

मा.अध्यक्षा–आपण आता जे उत्तर देत आहात ते योग्य आहे का? तेथील विद्यार्थ्यांसाठी शिक्षकच नसतील तर, या उत्तराला काही अर्थ आहे का? विद्यार्थी आणि शाळा आहेत म्हणून शिक्षणप्रमुख आहेत. विद्यार्थीच नसतील तर तुमच्या शिक्षणप्रमुख पदाला काही अर्थ नाही.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.चेअरमन, विहीत जी प्रक्रिया आहे किंवा जी पध्दत आहे, त्याप्रमाणे करावे लागत आहे.

मा.अध्यक्षा–विद्यार्थी आहात म्हणून तुम्ही आहात आणि तुम्ही विद्यार्थ्यांसाठी काम करायचे आहे.

(सभागृहात गोंधळ सुरू होता)

मा.अनिल राणे–यामध्ये कालमर्यादा आहे की नाही? मा.सभासद, दोन ते तीन महिन्यांपासून मागणी करीत आहेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, माझी शिक्षणप्रमुखांना विनंती आहे की, आपणांस मध्यंतरी जे अधिकार दिले आहेत ते पूर्ण आणि पूर्वीप्रमाणेच दिले आहेत आणि समायोजनासाठी पुन्हा मा.आयुक्त साहेबांकडे यावे लागते ही माहिती नव्याने मिळत आहे.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–बदल्या किंवा समायोजन किंवा नवीन नियुक्ती याबाबत मा.महा.आयुक्त साहेबांकडून मान्यता घ्यावी लागते.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–नवीन नियुक्तीबाबत आम्हाला मान्य आहे. परंतु जिथे शिक्षक नाहीत तिथे समायोजन करून शिक्षक दिले पाहिजेत, हा साधा हिशोब आहे आणि त्यासाठी प्रत्येक शाळेसाठी, मा.महा.आयुक्त साहेबांकडे मान्यता घ्यावी लागते, असे सांगून त्या मान्यतेसाठी किती काळ लावणार?

मा.अध्यक्षा–तुमच्याकडे याबाबतचा जी.आर.आहे का? किंवा तुमच्याकडे ते अधिकार नाहीत, असे लेखी सांगावे.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–यापूर्वीच्या ज्या बदल्या आहेत.

मा.अध्यक्षा–मग आम्ही सगळी कामे मा.महा.आयुक्त साहेब यांनाच सांगू. तुम्ही ती कामे करू नका.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (वि)–मा.अध्यक्षा, ही सभा संपल्यानंतर आम्ही शिक्षणप्रमुखांसह चर्चा करतो आणि हा विषय क्लेअर करतो.

मा.अध्यक्षा–सर,ही बाब अतिशय गंभीर आहे. या मागणीला ६ महिने झाले आहेत आणि मागील तीन महिन्यांपूर्वीच मा.सभासदानी सांगितले होते आणि आम्ही तशा सूचना दिल्या तरीसुध्दा हे इतक्या बेफिकीरपणे उत्तर देत आहेत. यांच्याकडे असे काही लेखी आहे का?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपल्याकडे डॉकेट ठेवताना मात्र, अतिरिक्त शिक्षक आहेत, असे म्हणतात आणि इकडे वर्गांसाठी शिक्षक नाहीत. हे केवढे मोठे विडंबन आहे.

मा.राहूल तुपेरे–मी तीन महिन्यापासून मागणी करीत आहे आणि ते नेहमी असे म्हणतात की, दोन दिवसात देतो, सोमवारी शिक्षक देतो आणि मंगळवार आला की, असे म्हणतात की, तुम्हाला शिक्षक मिळतील परंतु इथे या विषयावर चर्चा करू नका.

मा.अध्यक्षा–मला माहिती आहे की, त्या भागात ती एक मोठी शाळा आहे आणि तिथे त्या भागातील सगळया मुली शिक्षणासाठी जातात तिथे विद्यार्थी संख्या जास्त आहे आणि तरीसुध्दा अशी उत्तरे देण्यात येत असतील आणि आता तेथील विद्यार्थ्यांचा जो काही शालेय निकाल लागेल, त्या निकालास पूर्णपणे तुम्ही जबाबदार असाल. हे तुम्हाला मान्य करावे लागेल कारण शिक्षणप्रमुख म्हणून त्यांना अधिकार दिले आहेत. ते मा.महा.आयुक्त साहेब यांच्या परवानगीबाबत सांगत आहेत परंतु त्यांनी परवानगीसाठी डॉकेट ठेवले आहे का?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, आम्ही ते ठेवलेले आहे आणि आम्ही त्याबाबत चर्चा करतो.

मा.अनिल राणे–मा.अध्यक्षा, आम्ही म्हात्रे पूल ते रजपूत झोपडपट्टी या रस्त्यासदंर्भात मागे आंदोलन केले होते आणि त्यावेळी श्री.कुलकर्णी साहेब आले होते आणि त्यांनी मला १५ दिवसांची मुदत मागितली होती. परंतु यामध्ये आता एक महिना पूर्ण होत आहे. याबद्दल पुढे कोणती कार्यवाही केली आहे? याबाबतचा खुलासा करावा.

श्री.सतिश कुलकर्णी–मा.अध्यक्षा, हा जो रस्ता आहे याबाबत मूल्यांकन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या नगररचना विभागाकडे दिला आहे आणि आता ते प्रकरण मा.डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांच्याकडे अंतिम मंजूरीसाठी आहे. आमचे अधिकारी काल त्यांच्याकडे जाऊन आले आहेत आणि यामध्ये दोन ते तीन दिवसांमध्ये आम्ही ही अंतिम मंजूरी देऊ,असे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. त्यांच्याकडून हे प्रकरण आल्यानंतर महानगरपालिकेच्या स्तरावरील पुढील कार्यवाही करू.

मा.नगरसचिव–शेवटचा विषय घेण्यापूर्वी, आज जे विषय मान्य झाले आहेत ते सगळे वन–के अंतर्गत घ्यावयाचे आहेत का?

मा.अध्यक्षा–ते सर्व विषय वन–के अंतर्गत घ्यावेत.

मा.अनिल राणे–मा.अध्यक्षा, आपल्याकडे रस्त्यांचे डांबरीकरण करीत असताना जे चेंबर्स बुजविले जातात नंतर ते चेंबर ओपन होत नाही, असा प्रकार आमच्या प्रभागामध्ये झाला आहे. आता आपण भांडारकर रोड डांबरीकरण केला आहे आणि तेथील चेंबर्स गाडले गेले आहेत. आपण बी.एम.सी.सी.चा रोड कॉक्रीट केला आहे आणि तेथील चेंबर्स देखील गाडले गेले आहेत. यामुळे त्याचा बॅक तेथील सोसायट्यामध्ये जातो आणि आपल्या खात्याकडून ते चेंबर्स ओपन केले जात नाही. भांडारकर रोडवर सुध्दा असेच झाले आहे आणि मा.अति.आयुक्त साहेब, याबाबत आजच्या सगळया वर्तमानपत्रामध्ये बातमी आली आहे. आपण यासाठी एक विशेष मोहिम राबवावी. कारण पुणे शहरामध्ये असे बरेचसे चेंबर्स आहेत.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–डाबंरीकरणामध्ये चेंबर्स गाडले जातात आणि याकडे इंजिनिर्स व अधिकारी कोणीही लक्ष देत नाहीत. ड्रेनेज चोकअप झाल्यावर ते कोठे शोधणार?

मा.अनिल राणे–कर्वे रोडवर सुध्दा तशीच परिस्थिती आहे. नळस्टॉप चौक, अभिनव परिसर या सर्वठिकाणी बॅक मारते.
हे सर्व चुकीचे आहे आणि याबाबत श्री.राजेंद्र राऊत, अधी.अभि.(भवन) यांनी अभियंता स्टाफला तशा सूचना द्याव्यात.

मा.नगरसचिव–शेवटचा विषय.

विषय क्र.१४७०

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

अशा पध्दतीने सभा समाप्त झाल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**